
# कृषितीर्थ

RNI NO. MAHMAR49134
• डिसेंबर २०१८ • वर्ष १ • अंक १ • पृष्ठे ६० • मूल्य १० रु



# जैनच्या ठिबक तंत्राने जगात सर्वप्रथम भात पिकाविषयीचे पथदर्शी कार्य



ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचा वापर करून भाताचे उत्तम उत्पादन घेता येऊ शकते यावर आजही अनेकांचा विश्वास नाही. परंतु जैन इरिगेशन कंपनीने जैन हिल्सवर ठिबक सिंचनावर भाताचे भरघोस उत्पादन काढून दाखविले. भारताचे माजी कृषी मंत्री श्री. शरदरावजी पवार यांना या बाबत माहिती देताना अजित जैन, सोबत कंपनीचे संस्थापक डॉ. भवरलालजी जैन. *दि. ६.११.२०११*

# जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाचा विज्ञाननिष्ठ आविष्कार... जगात पहिल्यांदा आंब्याचे टिश्यूकल्चर



आंब्याची टिश्यूकल्चर पद्धतीने रोपे तयार करणे जगात अजून कुणालाही जमलेले नाही. कारण खालचा रुटस्टॉक आणि वरचे सायफन याचा ताळमेळ बसतच नाही. पण जैन इरिगेशनमधील शास्त्रज्ञांनी हा ताळमेळ जमवून टिश्यूकल्चर पद्धतीने आंब्याची रोपे व कलमे तयार करण्यात जगात प्रथम यश मिळविले आहे. ही रोपे-कलमे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना दाखविताना मोठे भाऊ शेजारी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व मान्यवर. *दि. ९.०१.२०१६*

# कृषितीर्थचे मनोगत



## अध्यक्षीय

**'कृषितीर्थ' चा पहिला अंक आपल्या हाती देताना मनापासून आनंद होतो आहे. आमचे परमपूज्य पिताजी श्रद्धेय मोठेभाऊ कृषिक्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यक्तिमत्त्व. शेतकऱ्यांना नवनवीन ज्ञान व तंत्रज्ञान पुरवून त्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी व कष्टाने भरपूर उत्पन्न मिळवून सुखी व समाधानी व्हावे हे स्वप्न भाऊंचे होते. ''शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचे हसू हा माझा सर्वश्रेष्ठ पुरस्कार आहे'' असे भाऊ मानीत असत. शेतकऱ्याच्या जीवनात रोज चैतन्याची सोनेरी पहाट फुलावी याकरिता शेती-संबंधातील नवनवीन माहिती पुरविण्याचा वसा आम्ही हाती घेऊन भाऊंच्या स्वप्नांची पूर्ती करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कामी आपणही आम्हाला सहकार्य कराल अशा अपेक्षेसह शब्दफुलांची ही ओंजळ तुमच्या चरणी वाहिली आहे.**



**अशोक जैन**
अध्यक्ष,
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

प्रिय वाचकहो! गेल्या २२ महिन्यांपासून नेमाने येणारे 'कृषिजल' हे मासिक आता आपल्याला 'कृषितीर्थ' या नव्या नावाने भेटत आहे. 'कृषितीर्थ' या मासिकाचा हा पहिला अंक. मा. भाऊंचे एक स्वप्न होते. शेतीत काम करणारा माझा शेतकरी शेती साक्षर असला पाहिजे. त्याने शेतीच्या विज्ञानाचा आणि तंत्रज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. यातून त्याला आपल्या मातीशी आपलेपणाने संवाद साधता आला पाहिजे. यासाठी भाऊंच्या मनात फार दिवसांपासून शेतीला वाहिलेले एक पूर्ण मासिक असावे असे होते. हे स्वप्न आम्ही भाऊंच्या आशीर्वादाने साकार करीत आहोत याचा आम्हाला अतिशय आनंद वाटतो आहे.

कृषितीर्थात शेती विषयीचे प्रबोधन जितके महत्त्वाचे आहे तितके ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचे शेतीतले सामर्थ्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे हा या मासिकाचा उद्देश आहे. आम्हाला अजूनही असे वाटते परंपरागत शेती व शेतकरी आजही आधूनिक शेतीविषयी फारसा जागृत झालेला दिसत नाही. याला काही अपवाद आपण गृहीत धरू. परंतु एकंदरीत शेतीविषयी जी वस्तुनिष्ठ जाणीव निर्माण व्हायला पाहिजे ती अद्यापही झालेली नाही. आजही शेतकऱ्यांना मातीची शक्ती कळलेली नाही. दुष्काळ पडला किंवा अवर्षण प्रवणाची स्थिती निर्माण झाली की तात्पुरती पाण्याची चिंता आपण व्यक्त करीत राहतो. पण ते काटकसरीने व काटेकोरपणे बारमाही वापरले पाहिजे, हा धडा कायमचा शिकत नाही. लोकसंख्या सतत वाढत असल्यामुळे दिवसेंदिवस शेतीचे पाणी कमी कमी होत जाणार आहे. या कमी पाण्यातून अधिक उत्पादन नवीन तंत्रांचा वापर करून कसे काढायचे या संबंधी जगभर जे निरनिराळे प्रयोग होत आहेत, ते आम्ही मासिकातून आपणांपुढे ठेवणारच आहोत. या सर्व प्रयोग व प्रयत्नांकडे आपणही डोळसपणे बघून ते कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शेती म्हणजे मातीला ओरबाडून उत्पन्न घेणे हे नाही. तर शेती म्हणजे मातीला आपल्या कुटुंबातला घटक मानून तिच्याशी संवाद करून, तिला फुलवून नैसर्गिकदृष्ट्या योग्य ते धान्य व फळेभाजीपाला घेणे हे प्रयोजन आहे. विदेशात शेतीबाबतीत त्यांच्या देशात अनेक चमत्कार व विक्रम करून दाखविले. त्यासाठी विदेशात जे वेगवेगळे प्रयोग झाले त्याचीही ओळख आम्ही आपणास नक्कीच करून देणार आहोत. आपल्या आसपासचे विविध प्रांतातले मित्र काही प्रमाणात शेतीत चांगले प्रयोग करताहेत. ते आपल्या पर्यंत पोहचावेत म्हणून त्यांच्या मुलाखतीही छापणार आहोत. त्यांनी केलेली पिकांसंबंधीची प्रायोगिक माहितीही आपल्याला निश्चित वाचनीय ठरेल.

अद्ययावत शेतीच्या माहिती बरोबरच शेती व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, खते व औषधांचा नेमका उपयोग, शेतमाल प्रक्रिया व निर्यात अशा अनेक विषयांचे मार्गदर्शन यातून आपणास निश्चित होईल. तसा आमचा प्रयत्न राहील. हेतू हा की, आपण आपल्या शेतीला जर समृद्ध केले तर आपणही समृद्ध होऊ हा आमचा उद्देश आहे. आपण याला अधिकाधिक प्रोत्साहन द्यावे. मासिकाचे सभासद व्हावे. आपले हे अंक म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनाचा संदर्भग्रंथ असतील. हे त्याचे मूल्य आपण ध्यानात घ्याल. शेवटी अपेक्षाही करतो की, भाऊंच्या स्वप्नातला शेतकरी समृद्धीने व देशाभिमानाने उन्नत झाला पाहिजे.

# हुंकार कृषितीर्थाचा



## संपादकीय

१२ डिसेंबर हा दिवस म्हणजे भाऊंचा वाढदिवस. कर्तृत्त्वाच्या समाधानाचे दव म्हणजे वाढदिवस. आयुष्याच्या देठ सांभाळणाऱ्या मोरपिशी स्वप्नांचा शामियाना म्हणजे वाढदिवस. या वाढदिवसाला पुराणकाळापासून औक्षण करण्याची प्रथा आहे. त्याला निरांजनाने ओवाळतात. 'तू स्वयंप्रकाशी हो.' हा याचा अर्थ. कुठेही अभद्र कर्तृत्वाचे छिद्र पडायला नको म्हणून डोक्यावर अक्षता. कपाळी कुंकु हेसर्वमंगलाचे प्रतीक. कापसाच्या धाग्यासारखा अखंड वाढो. कापूस आणिकर्तृत्त्वालासोन्याचा सुगंध लाभो म्हणून सोन्याच्या अंगठीने ओवाळायचे. थोरामोठ्यांचे आशीर्वाद घ्यायचे. सर्वांना गोड पदार्थांचे वाटप करायचे. ही आपली प्राचीन परंपरा. तिचे भान ठेवून भाऊंच्या वाढदिवसानिमित्त ज्ञानाची मेजवानी आपल्यापर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृषितीर्थ' हे मासिक या डिसेंबर महिन्यापासून सुरू करतो आहोत. हा वाढदिवसाचा पेढा आहे असे समजून तो ग्रहण करा एवढीच विनंती.



डॉ. सुधीर भोंगळे
संपादक

आदरणीय मोठेभाऊ भवरलाल जैन यांचे एक स्वप्न होते. शेती आणि पाणी या विषयाला महत्त्व देणारे मासिक काढावे असा त्यांचा विचार होता. बऱ्याचदा त्यांनी तो बोलूनही दाखविला होता. याबाबत काही वृत्तपत्रांच्या मालकांशी ते बोललेही होते. परंतु भाऊंच्या हयातीत हे मासिक सुरू होऊ शकले नाही. आता मात्र त्यांची स्वप्नपूर्ती करून शेतकऱ्यांच्या उन्नतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने जैन इरिगेशन कंपनीने मासिकाचा व ज्ञानप्रसाराचा हा वसा हाती घेतला आहे. भाऊंना वाटे शेती हा नुसता करण्याचा व राबण्याचा विषय नाही तर तो अभ्यासाचा विषय आहे. मातीची मशागत जशी करावी लागते तशी मनाची मशागत जर उत्तम झाली तर आपण मातीशी मनमोकळेपणाने बोलू शकतो. मातीही आपले स्वगत आपल्याशी मोकळेपणाने करू शकते. शेतीत अथक परिश्रम आहेत याबद्दल वाद नाही. परंतु श्रमाला जर चिंतनाची साथ मिळाली तर ओसाड माळरानाचे नंदनवन होऊ शकते याचे जैन हिल्स हे जिवंत आणि ज्वलंत उदाहरण आपल्या सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. जैन हिल्सचा वाढलेला हिरवा व्यापार, या व्यापारावर फुललेल्या फळबागा व गर्द वनराई आणि सत्य, अहिंसा, करुणेचा मूल्यसंस्कार करणारे गांधीतीर्थ ही भाऊंच्या स्वप्नांची भरारी गगनगामी होती. ज्यांच्या ध्येयापुढे आकाशाने नतमस्तक व्हावे आणि समुद्राने आपला काठ समृद्ध करावा असे महास्वप्न भाऊंनी पाहिले. कदाचित या स्वप्नांना लोक हसले असतील पण भाऊंनी ते सत्यात उतरवून दाखविले. याचे कारण भाऊंनी केलेली शेतीची निष्काम सेवा.

मातीला आई मानून केलेली तिची जपणूक आणि याला आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची दिलेली जोड. हे भाऊंचे सामर्थ्य विलक्षण होते. त्यांचे जगाकडे बघण्याचे डोळे अत्यंत तेजस्वी व दूरदृष्टीचे होते. जगाकडे बघायचे डोळे बघता–बघता येतात. बघण्यासाठी निरीक्षणाची दुर्बिण पक्की, स्थिर लागते. जग समजून घ्यायला जगाचे रूप अनुभवावे लागते. अनुभव बघून येतो. प्रत्येक पावलागणिक तो जाणीव देतो. त्यासाठी मन उघडे ठेवावे लागते. मनाला हाताशी धरून सारखा संवाद करावा लागतो. संवादातून निरीक्षणांना पक्केपण येते. हा संवाद एकांताच्या मठीत मुरवावा लागतो. तेव्हां दृष्टी येऊ शकते. याची जाणीव भाऊंना असल्यामुळे त्यांनी त्याच पद्धतीने स्वतःला घडविले. स्वतःच स्वतःचे गुरू झाले आणि ज्या जमिनीवर गांधीतीर्थ उभे राहिले त्याला भाऊंनी विज्ञानाची जोड देऊन आधुनिक शेतीचा वारसा नव्याने भारताला मिळवून दिला. कृषितीर्थाचा हा पहिला अंक आपल्या हाती देताना आम्हांला या गोष्टीचे मुद्दाम स्मरण होते आहे. याची नोंद घेणे उचित आहे असे आम्हांस वाटते.

'कृषितीर्थ हे' आमच्या दृष्टीने आम्हांला समर्पक नाव मिळाले आहे असे वाटते. यामुळे कदाचित भाऊंच्या पुढच्या स्वप्नांना नवा आकार लाभेल आणि तो आकार देण्यात अशोक, अनिल, अजित आणि अतुल ही भाऊंची चारही मुले नक्की परिश्रम करून यशस्वी होतील. ते आजही त्यादृष्टीने प्रयत्नशील आहेत हे आम्ही वेगळे सांगण्याची गरज नाही. 'तीर्थ' हा शब्द आपल्या

संस्कृतीत खूप महत्त्वाचा आहे. तो सर्वांना माहिती आहे. आपण तो नेहमी वापरतो. अनेक ठिकाणी सत्यनारायणाच्या तीर्थप्रसादाचे आमंत्रण येते. आपण न चुकता जातो. नारायणाला नमस्कार करतो आणि हाताच्या उजव्या खोल तळहातात तीर्थ घेतो. तळहाताच्या खोलीत भविष्यकाळ वाट बघत असतो. तो तळहातावरच्या रेषांमधून प्रकटतो. या तीर्थाला पंचामृत असे नाव आहे. पंचामृत म्हणजे माणसाला नवा उत्साह देणारे समर्थ मन. यामध्ये पाच महत्त्वाचे घटक असतात. दूध, दही, मध, साखर आणि तुप. दूध म्हणजे जीवनाचा प्रवाह वाहता आणि शुभ्र राहावा यासाठी. दही म्हणजे चिंतनशील जाणिवेचा परिपाक. मध म्हणजे जगातल्या सुंदर गोष्टींचा साठा मनाच्या कुपीत करणे आणि लोकांच्या गोड मनांना आकार देणे. साखर म्हणजे बालपणातला निरागस गोडवा. या निरागस मधुरपणात जगण्याचा ओलावा असतो. तूप म्हणजे निरोगी, निर्मळ घट्ट स्नेह. यांनी मिळून पंचामृत होते. अमृत म्हणजे सक्रीय होणे. सक्रियतेसाठी प्रवाहीत होणे, चिंतन करणे, संचयात रमणे, गोडवा आणणे आणि स्नेह ठेवणे या पाच तत्वांची गरज असते. ते सर्वांना सारखे आहे आणि ते सगळ्यांना मिळावे म्हणून पळीतून पंचामृत देण्याची प्रथा आहे. जगण्यातले समान चैतन्य म्हणजे पळी. ही पळी माणसे देवघरात जपून ठेवतात व वापरण्याआधी घासून पुसून स्वच्छ करतात.

वास्तविक पाणी सर्वत्र आहे. परंतु सगळ्या ठिकाणी ते सारखे नसते. काही ठिकाणी ते पाचक, हलके असते. काही ठिकाणी ते खोल किंवा उथळ असते. काही ठिकाणी जड व क्षारमय असते. तर काही ठिकाणी अथांग असते. उथळ पाण्याला खळखळाट फार असतो. तरी पाणी कसेही असो. पाण्याकडे पाहिले की मन शांत होते. मनाला नव्या आशयांचे धुमारे फुटतात. त्यातून मनाची खोली तयार होते. मन निववितेे. मनाचा प्रवाहीपणा सुस्पष्ट

## सामान्य माणूस आणि तीर्थ

*सामान्य माणूस हाच संस्कृतीचा नायक असतो. त्या सामान्य माणसांपासून संस्कृती मोजली जाते. हाच सामान्य माणूस संस्कृतीला वळण देतो. खरं तर संस्कृती ही संस्कृतीच असते. विचारांच्या परिवर्तनातून ती बदलते. नवीन विचारांच्या दिशा येतात. जुने विचार मागे पडतात. शेवटी संस्कृतीचा प्रवाह अखंड असतो. राम, कृष्ण, शिव हे त्या संस्कृतीचे घाट आहेत. तीर्थ सामान्य माणूस निर्माण करतो. पाण्याच्या स्पर्शातून त्याला व्यापकपणाचे भान आले की ती संस्कृती फुलते, वाढते. शेवटी संस्कृतीचे सामर्थ्य, ताकद सामान्य माणूस हेच असते. सामान्यात रामाचे सामर्थ्य होते. रामाने कुठेही अपेक्षा ठेवली नाही. जे जे मिळाले, जिंकत गेला ते ते तीर्थप्रसादासारखे वाटून टाकले. एकही प्रदेश रामाने आपल्या ताब्यात ठेवला नाही. विभूतीपूजाही केली नाही. विभूती पूजा आली की संस्कृती थांबते. विभूती पूजेपेक्षा कर्तव्यपूजा व त्यागपूजा जास्त झाली पाहिजे. तसे झाले तर ज्ञानाच्या उंचीने माणसे वाढतील. मोठ्या भाऊंसारखी ध्येयनिष्ठ माणसे नेहमी 'आकाशी झेप घे पाखरा', या वृत्तीचीच असतात. मला माझ्या जगण्याचे मूल्य कळले पाहिजे ही सगळ्यात महत्त्वाची जाणीव आहे. ती करून देण्याचे काम या कृषितीर्थातून होणार आहे.*



होतो. असे पाणी मनाचा डोह जपते. नव्या नव्या आशयांना पालवी देते. अशा पाण्याला खोलीही असते आणि प्रवाहीपणही, असे पाणी अनेकांना पाझर देते. जगण्याला मूल्यत्व प्राप्त करून देते. म्हणून त्याला तीर्थ म्हणतात. गंगा हे सहनशिलतेचे सौभाग्यमूल्य आहे. यमुना किंवा कालिंदी हे श्रेष्ठ कर्मयोगाचे मूल्य आहे. सरस्वती हे ज्ञाननिष्ठेचे उत्तम उदाहरण आहे. कृष्णा मनाला शांतता देते. गोदावरी हे अखंड श्रम व परमेश्वर मानणारे मूल्य आहे. तिच्या काठी असलेले दंडकारण्य ही गोदावरीची फार महत्त्वाची देणगी आहे.

गंगेचा भक्तिप्रवाह, यमुनेचा कर्मप्रवाह आणि सरस्वतीचा ज्ञानप्रवाह एकत्र आल्यावर जगण्यात जी सुंदरता येते, त्याला संगम किंवा तीर्थ म्हणतात. तीर्थ म्हणजे जगण्याला नैतिक मूल्य देणारी भावशक्ती. तीर्थ म्हणजे सर्वार्थाला सामर्थ्य देणारे स्पंदन म्हणून अलाहाबाद संगमात वेणीदान करतात. वेणी म्हणजे प्रवृत्ती आणि निवृत्ती अशा दोन पेडाचा संगम. हा संगम सुख-दुःखात नसून प्रयागचा संगम श्रद्धाशील असतो. तिथे श्राद्ध करतात. मातृगया म्हणजे सेवा आणि पितृगया म्हणजे कर्तव्य. या दोन निष्ठांनी आयुष्य सुलभ होते. जगण्याला आनंद वाटतो. वर्तमानकाळातून पुढे जावेसे वाटते. मन स्वच्छ होते. त्याला तीर्थ म्हणतात. नदीत जाऊन देह घासण्यापेक्षा नदीला दुरून नमस्कार करून शुद्ध मनाने स्वतःला स्वच्छ केले तरी आपण तीर्थ होऊ शकतो.

## चिंतन कृतीनेच कल्याण

*आत्मज्ञान हाच चिंतनाचा प्रारंभ होय. आत्मबोधाविना चिंतन शक्य नाही. मला जर स्वतःचीच ओळख नसेल, तर विचारांना पायाच उपलब्ध नाही असे होईल. आत्मबोध नाही, स्वतःचे खरे स्वरूप कळत नाही, असा विचारकर्ता जेव्हां हीनदीनपणे याचना करतो, प्रार्थना करतो, काही वर्ज्य करतो, मन इतर विषय वगळून एकाच गोष्टीवर जखडण्याचा प्रयत्न करतो, त्याच्या वाट्याला फक्त गोंधळ आणि भ्रमच येणार. चिंतनाचा प्रारंभच आत्मज्ञानात होत असतो आणि त्यासाठी विचाराची प्रत्येक हालचाल, प्रत्येक तरंग, भावनेची प्रत्येक उर्मी, जाणीवेचे एकूण एक स्तर केवळ वरवरचे खरंच नव्हेत तर खोलवर लागून राहिलेले गूढ मनोव्यापार, यांचे नीट भान असले पाहिजे. चिंतन म्हणजेच आत्मबोध, निजबोध आणि निजबोधाशिवाय चिंतन नाही. आत्मज्ञानाशिवाय प्रार्थना करणे निरर्थक आहे. जेव्हा आपल्याला आत्मबोध असतो तेव्हां विचारही सम्यक व समतोल असतात आणि आपले कर्मही योग्य तेच होते. योग्य कर्म घडत असेल तर भ्रांती, गोंधळ उत्पन्नच होत नाही. शेतकऱ्याला सतत ध्यानात म्हणजे पूर्ण सावधानतेत रहावे लागते. चिंतनच करावे लागते. हे कृषितीर्थाचे चिंतन जो करतो त्याचे कल्याण होते.*



'गांधी तीर्थ'... सत्य, अहिंसा, करुणेचा कृतिशील संस्कार




भाक्रा नानगल धरण


भारतातली तीर्थे संजीवनी देणारी आहेत. वर्षानुवर्षे या तीर्थांनी राष्ट्रीय संस्कृतीतली एकात्मता टिकविली आहे. 'सहनाववतु सहनौभुनक्तु' हे आपले ब्रीद आहे. आपल्याला हे माहिती आहे. आपण चारीधाम करून आलो की तीर्थविधी करतो. यालाच काही जण मावंद्य म्हणतात. याचा अर्थ असा आहे की तीर्थांना बघून आपण आपले शुद्ध मन समाजाला उदार मनाने वाटावयाचे असते. त्यातून आपण नवे व्हायचे असते. ही व्यापकता जीवनाला नवे भान देते. ही पुण्याई सामाजिक आवर्तनांमध्ये खर्च केली, की परिवर्तनाचा नवा प्रवाह समाजास लाभतो. समाजाला जेवायला बोलावतात. जेवण म्हणजे बंधुता. तीर्थ म्हणजे समता नि प्रसाद म्हणजे स्वातंत्र्य. ही तीन मूल्यांची जाणीव जी भेट करून देते ती 'तीर्थभेट' असते. त्यातून माणूस समंजस होतो. तो प्रादेशिक न राहता भारतीय होतो. म्हणून तीर्थक्षेत्रे आपण जपतो. नद्यांची तीर्थे नेहमीच संजीवनी देतात. भारतीयांच्या मनाला या तीर्थांचे आजही आकर्षण आहे. तीर्थक्षेत्रांनी जगायला आत्मबळ दिले. म्हणून आजही तीर्थे आम्हाला प्रिय आहेत. वडिलांना आपण 'तीर्थरूप' असे पत्रात लिहितो नि ज्येष्ठांना 'तीर्थस्वरूप' असे लिहितो. आई-वडिल ही आमची तीर्थक्षेत्रे. ती जीवनमूल्ये देतात. अशी घरे तीर्थ असतात. त्यांना 'तीर्थघरे' म्हणतात. स्वातंत्र्याच्या नावावरील यथेच्छ स्वैराचाराला वेसण घालायला तीर्थ हवे. ते स्वच्छ हवे. पाश्चात्य शास्त्रज्ञ गंगोत्रीपाशी तपाला बसतात नि आम्ही गंगोत्रीवर घाण करून येतो. हे सारे वाचून तीर्थ कशाला म्हणावे हे उमजले तरी तीर्थाला धन्यता वाटेल.


## व्यक्तिमत्त्वावर परिणाम कुणाचा?

*आपलं व्यक्तिमत्त्व जन्मापासून ठरलेलं असतं (नेचर) का बाहेरच्या अनुभवांमुळे ते घडत किंवा बदलत जातं (नर्चर) याविषयीचा वाद अनेक शतकांपासून चालू आहे. आपलं मन जन्मापासूनच तयार होऊन येतं असे प्लेटोला वाटे. देकार्तलाही तसंच काहीसं वाटे. पण आपलं मन हे कोऱ्या पाटीसारखं असतं आणि आपल्या अनुभवांनी त्यावर लिहिलं जात असं जॉन लॉकला आणि तर अनुभवावर आधारित ज्ञानावर भर देणाऱ्या एंपिरिसिस्ट तत्त्वज्ञांना वाटे. गॅल्टन, गोहार्ड, टर्मन आणि अनेकजणांनी बुद्धीप्रमाणेच व्यक्तिमत्त्वही आनुवंशिकतेनं निर्माण होतं असं मांडलं. तर पाव्हलॉव्ह, वॉटसन, स्किनर आणि इतर बिहेवियरिस्ट मंडळींनी व्यक्तिमत्त्व आपल्या अनुभवांवरून ठरतं आणि खरंतर ते 'कंडिशन' करून बदलत ही येतं असं मांडलं. हा वाद अजूनही चालू आहे. पण आनुवंशिकता (नेचर) आणि अनुभव (नर्चर) या दोघांचा परिणाम व्यक्तिमत्त्वावर होतो असं आज बहुतेकजण मानतात.*

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेत पंतप्रधान पंडित नांगलचे जवाहरलाल नेहरू यांनी दामोदर व्हॅली योजना किंवा हिराकूड धरण योजना किंवा भाक्रा नानगलचे धरण असे विविध प्रकल्प राबविले. त्यातून नव्या भारताची पावले उमटू लागली. त्याबद्दल पंडित नेहरूंनी असे उद्गार काढले होते,


पायथॅगोरस


कोपर्निकस


गॅलिलिओ



आयझॅक न्यूटन



मेरी क्युरी


स्टीव्हन वाईनबर्ग

जशी पवित्र तीर्थे ही भारतीय संस्कृतीची प्रसादचिन्हे आहेत तशी आजची विज्ञानतीर्थे ही भारताची आधुनिक तीर्थे आहेत. आधुनिक भारताच्या विविध प्रकल्पात आपण विविध भव्य योजना पाहतो. यातून आधुनिक जीवनमानाची सुधारणा घडते. हा उद्देश डोळ्यांपुढे ठेवून आदरणीय मोठ्याभाऊंनी 'गांधीतीर्थ' निर्माण केले. ते बघून जगाने आश्चर्याने तोंडात बोटे घातली. तोच ध्यास या कृषितीर्थातूनही व्यक्त होईल.

स्वप्ने सगळेच पाहतात. कुणाला लॉटरीचे स्वप्न पडते. कुणाला महालाचे स्वप्न पडते. कुणाला काहीही विचित्र स्वप्ने पडतात. परंतु निष्ठावंत ध्येयाची माणसे नेहमीच जनकल्याणाची भव्य स्वप्ने पाहात असतात. संत ज्ञानदेवांनी 'जो जे वांछील तो ते लाहो' असे मानवतेच्या मैत्रीचे भव्य स्वप्न पाहिले आणि त्यातून त्यांना दुसरे स्वप्न, दिसले ते म्हणजे 'आजि सोनियाचा दिनु, वर्षे अमृताचा घनु' असा सुंदर प्रत्यय आला. तो आपण आज अनुभवित आहोत. संत नामदेवांनी भारताच्या एकात्मतेचे भव्य स्वप्न पाहून 'अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकाशी।' असे स्वप्न पाहिले. वैष्णव धर्मातून व्यापक मैत्रीची शिकवण दिली. संत एकनाथांनी 'माझे माहेर पंढरी। आहे भिवरेच्या तिरी' असे आपणाला सांगितले आणि समतेचे भव्य स्वप्न पाहिले. नाथांचे चिरंजीव पद म्हणजे एकात्मतेचे सुंदर स्वप्न होय. संत तुकारामांनी 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ। कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।' असा दिव्य संदेश दिला आणि विश्व मैत्रीचे संगमरवरी स्वप्न आपल्याला दिले.



डॉ. बाबा आमटे


डॉ. शिवाजीराव पटवर्धन

**स्वप्नी जें देखिले रात्री। तें तें तैसेंची होतसे।**
**हिंडता फिरतां गेलों। आनंदवनभुवना।।७।।**

यासारखे ५६ ओव्यांचे समर्थ रामदासांचे स्वप्न 'आनंदवनभुवनी' याच नावाने प्रसिद्ध आहे. ज्यातून छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्राचे आनंदवनभुवन करून दाखविले. दिव्यदृष्टी असणारीच माणसे अशी भव्य स्वप्ने पाहू शकतात. कर्मयोगी बाबा आमटे यांना उजाड माळरान दिसलेच नाही. त्यांना दिसले ते आनंदवन. डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी महारोग्यांच्या सेवेतून तपोवन निर्माण केले.


वैज्ञानिकांनी अशीच सुंदर स्वप्ने पाहिली. आयझॅक ॲसिमॉव्हनं प्रथम यंत्रमानवाची कल्पना मांडली आणि नंतर काही दशकातच रोबोज तयार झाले. आर्थर क्लार्कने कृत्रिम उपग्रहाची कल्पना प्रथम मांडली आणि तंत्रज्ञांनी नंतर त्याची निर्मिती केली. पृथ्वी विश्वाच्या केंद्रस्थानी असून ती एका आगीभोवती फिरतेय हे सांगणारा गणितज्ज्ञ पायथॅगोरस, सर्व विश्व बारीक अविभाज्य अणूंपासून बनलेले आहे असे म्हणणारा डेमॉक्रिटस, सूर्याला थांबविणारा शास्त्रज्ञ कोपर्निकस (त्याचे खरे नाव निक्लास कोपर्निंग), आधुनिक विज्ञानाचा पाया रचणारे कोपर्निकस, टायको आणि केप्लर, प्रयोगक्षम विज्ञानाचा जनक गॅलिलिओ, सतत भांडणारे कॅल्क्यूलसचे दोन जनक आयझॅक न्यूटन आणि लिबनिझ, रेडियमचा शोध लावणारी व दोनदा नोबेल पारितोषिक मिळविणारी मेरी क्यूरी, इलेक्ट्रॉनचा शोध लावणारा जे. जे. थॉमसन, अणूच्या गाभ्याची कल्पना मांडणारा रदरफोर्ड, वेव्ह थिअरीचा जनक एर्विन श्रॉडिंगर, फर्स्ट थ्री मिनिटापर्यंतची विश्वकहाणी सांगणारा स्टीव्हन



अल्बर्ट आईनस्टाईन


स्टीफन हॉकिंग


जे. जे. थॉमसन


कार्ल शील


जोसेफ ब्लॅक


रदर फोर्ड



## शेती यशस्वीतेच्या वाटचालीचा मार्ग

*आधुनिक काळामध्ये आपण जसा शिक्षण, आरोग्य, घर, रस्ते, वाहतूक या गोष्टींकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलवलेला आहे आणि दोन-तीन पिढ्यांपूर्वी आपण जसे राहात होतो, वागत होतो त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने आता वावरतो. तिच गोष्ट किंबहुना अधिक प्रकर्षाने ती शेतीला लागू आहे. शेती ही केवळ कष्टाची आणि नांगरटीची असे न मानता शेती ही वैज्ञानिक पद्धतीने करायची, पाण्यासाठी सूक्ष्मसिंचनासारखी (ठिबक व तुषार) योग्य ती पद्धत वापरायची, त्या त्या प्रदेशाला अनुकूल होईल अशी पीकरचना स्वीकारून शेती करायची, मातीची परीक्षा, खते व बी-बियाण्यांची आधुनिक निर्मिती, बियाण्याचा फेरपालट यातून शेतीची उत्पादकता वाढवायची आणि कमीतकमी पाण्यात जास्त उत्पन्न केवळ हंगामी नव्हे तर बारा महिने कसे मिळेल या पद्धतीने तिची रचना करायची म्हणजे आधुनिकतेकडे जायचे. अशा प्रकारची उन्नत व्यवस्था शेती क्षेत्रामध्ये उभी करणे आणि त्यात शेतीमध्ये करावयाच्या गुंतवणुकीबरोबरच तिच्यात पिकणाऱ्या उत्पादनांचा बाजार व्यवस्थेशी, प्रक्रिया व्यवस्थेशी आणि साठवण व्यवस्थेशी, योग्य ती सांगड घालणे म्हणजे उन्नत कृषी स्वीकार. ही पद्धत शेतकऱ्यांनी कशी व कितपत अंगीकारली आहे आणि त्यातून त्यांना नेमकी काय उपलब्धी हस्तगत झाली आहे व भविष्यात आणखीन काय दिशेने पुढे जावे लागणार आहे याचा अभ्यास व चर्चा ही आता काळाची गरज झाली आहे. तोच यशस्वी वाटचालीचा मार्ग आहे.*

वाईनबर्ग, आईनस्टाईनच्या जनरल थिअरीवरून ब्लॅकहोलची कल्पना मांडणारा कार्ल श्वार्टझ्चाइल्ड, अपंगत्वावर मात करून विश्वाचा वेध घेणारे स्टीफन हॉकिंग, फॉस्फरस बनविणारा कार्लशील, ऑक्सिजन वायू शोधणारा जोसेफ प्रीस्टले, कार्बन डायऑक्साईडवर संशोधन करणारा जोसेफ ब्लॅक, थोरियम धातू शोधणारा जॉन्स जेकब बर्झेलियस, कृत्रिमरीत्या जीव तयार करण्याचा प्रयत्न करणारे हॅरॉल्ड युरे आणि स्टॅनले मिलर किती म्हणून शास्त्रज्ञांची नावे घ्यावीत! अशी मोठी माणसे सर्व क्षेत्रात झाली आहेत. आणि त्या सर्वांनी सामान्य माणसाला सहजपणे जगता आले पाहिजे हा ध्यास घेतला. ध्येयनिष्ठ प्रकल्पांनी आत्मविश्वास दिला म्हणून ही सारी तीर्थे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली.

कृषितीर्थाने असे व्रत घेतले आहे. शेतीच्या प्रश्नांचा यथार्थ व सर्वांगीण विचार यात होईलच पण आपला शेतकरी शेतीसाक्षर झाला पाहिजे. त्याला ऋतुंचे नवे भान आले पाहिजे. त्याला काळाची पावले ओळखता आली पाहिजेत. आपल्या शेतीसाठी त्याने कुणावरही अवलंबून राहता कामा नये. असे स्वच्छ भानाचे प्रवेशद्वार म्हणजे आपले 'कृषितीर्थ' मासिक असेल. आपण सारे जण नेहमी म्हणतो, शेतकरी स्वयंपूर्ण व स्वावलंबी झाला पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञान त्याने शेतीत वापरले पाहिजे. त्याने नवनवीन प्रयोग केले पाहिजेत. परंतु त्याने नेमके काय व कसे काम केले पाहिजे ते कुणीही सांगत नाही. बऱ्याचदा शेतकरीही एकमेकांना खुलेपणाने मार्गदर्शन करायला व अनुभवाच्या देवाणघेवाणीला तयार नसतात. अशा वेळी भवरलाल भाऊंनी शेतकऱ्यांसाठी विविध पिके व निरनिराळ्या तंत्रज्ञानाचा वापर केलेले भव्यदिव्य असे प्रकल्प व पिकांची प्रात्यक्षिके उभी करून शेतकऱ्यांना ती बोलावून दाखविली. त्यांची निवास-भोजनाची व्यवस्था करून त्यांना तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षण दिले. नेमक्या मोजक्या पाण्यातून सुद्धा नंदनवन कसे फुलविता येते ते भाऊंनी कृतीतून सिद्ध करून दाखविले. त्यामुळे पक्ष्यांना हिरवी घरे मिळतात. गायीगुरांना हिरवा चारा मिळतो. त्यांची हिरवी भाषा फक्त शेतकऱ्यांनाच कळते हे यातून समजते.

केवळ साधनांची अनुकूलता शेतीला पुरेशी नाही. अनुकूलतेबरोबर वाचणारे मन हवे. डोक्यात अनुभव मुरवावा लागतो तर दृष्टी येते. नव्या नव्या कल्पनेचे पंख उमलतात. या कल्पना गगनाला गवसणी घालून मेहनतीचे इंद्रधनुष्य उभे करतात. घामाच्या सचेल धारांनी न्हाऊन निघतात. काबाडकष्ट करत ढगांकडे मोठ्या आशेने पाहून अगतिक होऊन आकाशाला हात जोडतात. वेळीच भरपूर बरस पण अवेळी येऊन धिंगाणा घालू नकोस अशी हात जोडून जोडून काकुळतीने विनंती करतो. हे सगळे शेतीतच शक्य आहे. त्याशिवाय अशी भव्य स्वप्ने दिसत नाहीत. इथे केवळ शेतीचे महात्म्य वर्णून चालणार नाही. इथे बोलण्यापेक्षा क्रिया करून दाखविणे जास्त महत्त्वाचे आहे. नाही तर आपल्याला समर्थ रामदासांनी स्पष्टपणे बजावले आहेच क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.

शेतीतले नवे नवे प्रयोग 'कृषितीर्थ'च्या माध्यमातून आम्ही आपणापुढे ठेवूच. परंतु याबरोबर शेती मनाची चिंतनशीलता कशी प्रगल्भ होईल, छोट्या छोट्या प्रकल्पातून क्रियाशील मने कशी निर्माण होतील याची जाणीव निर्माण करून वाढीला लावण्यासाठी कृषितीर्थ सहाय्यभूत होईल. आपण नेहमीच तीर्थाचे भक्त असतो. त्यांना आपण मानतो. याचे दर्शन पत्र संस्कृतीतून फार पूर्वीपासून होत आले आहे. पण आता पत्र संस्कृती लोप पावत चालली आहे. सगळीकडे व्हॉटस्‌अप, ट्विटर, फेसबुक, एसएमएसचा जमाना आहे. त्यामुळे तीर्थे संपली आहेत आणि पिता न येणारे पाणीच जास्त उरले आहे. अशा वेळी माणसाला सुजाण करणे आणि शेतीबाबत सजग करणे हे फार महत्त्वाचे काम आहे असे आम्हांला वाटते. शेती–पाण्याच्या प्रत्येक कामात एकात्मिक धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे. सरकारनेही तसेच पॅकेज तयार करायला हवे.


## शेतीचे नवमूल्य काय?

*शेतीत आणि जीवनात राम पाहिजे तरच शेवटचे रामनाम सुखाने होऊ शकते. राम ही व्यक्ती नाही. ते जीवनाचे मूल्य आहे. ते वर्तमान, भूत, भविष्य याच्या पलीकडे आहे. तुम्ही माना, न माना त्यांचे काही बिघडत नाही. राम हे विश्वाचे चैतन्य आहे. त्याच्या नावाचा नुसता उच्चार केला तरी अनुभूती येते. चैतन्य मिळते. लक्ष्मण वैश्विक कर्तव्य आहे. जानकी विश्वाचे वैराग्य आहे. भरत भक्तीतली मैत्री आहे. शत्रुघ्न सेवा आहे तर हनुमंत दासपणाचा आदर्श आहे. वैराग्य म्हणजे अनुभूतीने विवेकपूर्ण जगण्याचे उत्तर. वैराग्य हे अरण्यात, तपोवनात राहून अजिबात मिळत नाही. वैराग्य उपजत असावे लागते. माझा मोठेपणा माझ्यातूनच निर्माण व्हावा याला राम म्हणतात. विश्वामित्र रामाला म्हणाले, ''माझे नाव घेऊन बाण सोड.'' त्यावर रामाने दिलेले उत्तर फार मार्मिक आहे. राम म्हणाला, ''गुरूचे नाव घेऊन धनुष्यबाण सोडले तर माझे कर्तव्य काय? माझे काम मी स्वतःच्या हिमतीवर आत्मविश्वास पूर्वक केले पाहिजे.'' शेतकऱ्याने शेतीसुद्धा त्याच पद्धतीने केली पाहिजे. रामाने त्याच्या संपूर्ण कार्यात सर्व लोकांना निर्भय केले. त्यांना विचार करण्याचे सामर्थ्य दिले. महाभारतात सगळ्या प्रकारचे विकार आहेत पण रामायणात खल कोणी नाही. सगळे मूल्यांचे संकल्पन आहे. लक्ष्मण हा मानुष पातळीवरच नाही. मूल्यनिष्ठ माणसांना कमीतकमी शारीर पातळी असते. मूल्याच्या आकाशातून ते प्रवास करीत असतात. आपण त्यांना सामान्य पातळीवर आणतो. आपल्याला त्यांच्या उंचीपर्यंत जाता येत नाही ही खरी अडचण आहे. ती कृषितीर्थाच्या वाचनातून दूर करायची आहे. म्हणून शेतीचे नवमूल्य काय हे अंकातून आपल्या समोर ठेवले जाणार आहे.*

**मसाला प्रकल्प, फूड पार्क, जैन व्हॅली, जळगाव**



या दृष्टीने धोरणकर्ते व अंमलबजावणी करणारी यंत्रणा यांचे उच्च पातळीवरून प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने भविष्यात पावले टाकावी लागतील. मा. भाऊंनी हे काम हीच ईश्वरपूजा मानून अशा कामांचे पथदर्शी प्रकल्प देश व जगभर उभे केले. उण्यापुऱ्या ४०-४५ वर्षात हे सगळे उभे करणे त्यांना कसे काय शक्य झाले याचे अनेकांना कुतूहल आहे. पण ध्येय, जिद्द, चिकाटी आणि मेहनत हे सगळे एका ठिकाणी तंतोतंत जुळून आले तर काय घडू शकते याची कहाणी म्हणजे भाऊंचे जीवन आहे. सगळ्या व्याधींवर मात करीत त्यांनी केलेले प्रयोग ही आजच्या आधुनिक हायटेक शेतीची तीर्थ आहेत. आपणही ती आपल्या शेतीत कशी आणू, त्यासाठी काय करायला पाहिजे, त्याकरिता आपली कितपत तयारी आहे, खरोखर आपण मन ओतून व अंगमेहनत करून अशी शेती करणार आहोत की नाही याविषयीची सारी अभ्यासपूर्ण चर्चा आम्ही आपल्यापुढे ठेवू. अभ्यासाला शिस्त लावू. केवळ पिकाचे उत्पादन वाढविण्याऐवजी मने जोडणारी निरोगी पिके घेऊ. यासाठी 'कृषितीर्थ' हवे आहे.


भवरलालजी व कांताबाई जैन

आज पाश्चात्य राष्ट्रात नद्यांना व पाण्याला माणसांसारखे सांभाळले जाते. शेतजमीन म्हणजे माती लहान मुलासारखी जपली जाते. आम्ही मात्र पैशाच्या मागे लागून व धावून आमच्या काळ्या आईला (माती, वाळू, जमीन) विकून टाकतो आणि जीवनाची धूळधाण करून घेतो. मिळालेला पैसा अनेकांना चांगल्या कारणांसाठी वापरता येत नाही. बऱ्याचदा तो वाईट प्रवृत्तींकडे जातो. ही सारी राक्षसी प्रक्रिया थांबली पाहिजे असे मनापासून वाटते. या स्वैराचाराला मनच जबाबदार आहे. मनाने घेतलेला हा मनामनांचा शोध आपल्याला 'कृषितीर्थ' वाचताना आवडेल. आदरणीय भाऊंनाही आनंद वाटेल. घराघरात हे तीर्थ पोहोचले पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्याचा तो हरिपाठ बनला पाहिजे. ते वाचून त्याला रोज नवनवीन शंका व प्रश्न निर्माण झाले पाहिजेत आणि ते त्याने आम्हांला विचारले पाहिजेत. आमचे कृषिशास्त्रज्ञ निश्चित त्यांच्या शंकांचे निरसन करतील व त्वरित त्यांना उत्तरे देऊन अचूक असे मार्गदर्शनही करतील. आपल्या प्रश्नांची उत्तरे देताना आम्हांला आनंद वाटेल. शेतीत नवनवीन प्रयोग करणाऱ्या गुणवंतांना आम्ही या मासिकात आदराने स्थान देवू. त्यांच्याशी संवाद साधू. शेतीतून जे जे काही भरघोस पिकते त्या पिकण्यातून मनामनांना उभारी दिली गेली पाहिजे. कृषितीर्थाची ही प्रेरणा नक्कीच महत्त्वाची आहे. आपल्या दिनक्रमात सतत सक्रिय होण्यासाठी शेती सांभाळलीच पाहिजे. जैन पाईप, जैन ठिबक सिंचन योजनेसारख्या अनेक विविध योजना व प्रक्रिया कारखानदारी आणि कराराची शेती केवळ आपल्याच देशात नव्हे तर परदेशातही जैन उद्योग समूहाने विकसित केलेली आहे. जगातले हे सगळे अद्ययावत ज्ञान व तंत्रज्ञान याचा खजिना या मासिकातून आपल्यापुढे ठेवला जाईल. एका अर्थाने 'हे विश्वची माझे घर' अशी स्थिती यातून तुम्हाला प्राप्त होईल. आजच्या शेतीला ही नवी दृष्टी देणे, ती आपल्यापर्यंत पोहोचविणे हे आम्ही कृषितीर्थाचे पवित्र तीर्थ समजतो. आम्हाला यातून फक्त एकच अपेक्षा आहे. या साऱ्याला आपण प्रतिसाद द्यावा. आपल्या मित्रांनाही हा निरोप कळवावा. खऱ्या अर्थाने शेतकरी राजा सज्ञान झाला पाहिजे.

जागरूकता रात्रीच्या पहाऱ्यावर नसते. आळशीपणावर पहारा ठेवून मन जागृत ठेवावे लागते. वाडवडिलांनी करून ठेवले म्हणून त्यावर आपण फक्त चंगळ करायची नसते. स्वकर्तृत्वाची धार मनाला किती आनंद व सुख देते याचा अनुभव स्वकष्टातून घ्यायचा असतो. हे कष्ट करण्याची प्रेरणा या तिर्थाने जरी आपल्याला दिली तर आमच्या प्रयत्नांचे सार्थक झाले असे समजू. स्वकष्टाने मोठी झालेली आणि आयत्या पिठावर रेघोट्या ओढून रसातळाला गेलेली अनेक उदाहरणे आपल्यासमोर व आसपास आहेत. ती सांगण्याची पाळी किमान या पहिल्या अंकाला तरी येऊ नये असे आम्हांस वाटते. एक निश्चय करू या की आपण सारे मिळून भाऊंचे हे भव्य स्वप्न पुढे नेऊ या. शेतीत सजग होऊ या. संप करण्यापेक्षा आपण आधी सक्रिय झाले पाहिजे. नंतर अधिकार मिळविले पाहिजेत. यासंदर्भात भाऊंनी घेतलेल्या कष्टांचे स्मरण होते. भाऊंनी आणि कांताबाईंनी हा जो शेतीप्रपंच केला तो मानवी प्रपंचापेक्षाही व्यापक आणि अर्थपूर्ण आहे. याचे स्मरण ठेवून शेतीतल्या अभ्यासशील मनांना आपण लिहिते करू या आणि कृतार्थतेने जगण्यातला आनंद दुसऱ्याला वाटून आपणच तीर्थ होऊ या.

**बहुत काय लिहिणे!**

**असो. हे विज्ञापना सुज्ञास सांगणे न लगे.**

आम्ही आपले आहोत. आपण आमचे आहात. अशा मैत्रीतून 'कृषितीर्थ' समृद्ध होवो ही त्या जगनियंत्यापाशी प्रार्थना.



# ॐ काराचे सामर्थ्य

ॐकार हा सृष्टीचा मूळ स्वर आहे. सृष्टी जेव्हा निर्माण झाली तेव्हा तीने जगण्याचा जो पहिला हुंकार दिला तो ॐकार आहे. ओम् हा शब्द विश्ववाचक आहे. तो विश्वस्पर्शी आहे. हा शब्द तीन वर्णांनी बनलेला आहे. अ, ऊ आणि म. अ म्हणजे अभ्यास. ऊ म्हणजे उच्चार आणि म म्हणजे मनन. या तीनही शक्ती जो आपल्यात निर्माण करतो त्या मूळ स्वराला 'ओम' म्हणतात. कुठल्याही पूजेचा आरंभ आणि कुठल्याही प्रार्थनेचा आरंभ ओमने होतो. कारण ओम् मध्ये पवित्र शक्ती सतत वास करते. ओम् हे सृष्टीचे आदी केंद्र आहे. कुठल्याही कार्याच्या आरंभाला लागणारा जो दमदार श्वास आहे त्या श्वासाचे सगुणरूप म्हणजे ओम् आहे.

आपण भूमिपूजन करतो, आपण वास्तुशांत करतो. आपण मोठमोठ्या इमारतींची उद्घाटने करतो. त्या सगळ्या कार्याचा आरंभ आपण ओम् या शब्दाने करतो. कारण हा शब्द सगळ्या वर्णांमध्ये आणि सगळ्या अर्थांमध्ये पुरून उरणारा आहे. भगवान शिवांनी जेव्हा आपल्या तांडवातून पहिली वर्णमाला निर्माण केली त्या वर्णमालेचा सूर ओम् होता. सरस्वतीने जो गाण्याचा पहिला स्वर दिला तो ओम्ने सुरू होणारा होता. शिल्पामध्ये, चित्रामध्ये, रंगांमध्ये जिथे जिथे नव्याचा स्पर्श लाभलेला आहे ती सगळी


ओंकाराची रूपे आहेत. ओम् हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक शब्द नाही. तो सर्वस्पर्शी आत्मिक श्वास आहे. म्हणूनच योगाचा आरंभही ओम्ने होते. विद्येची सुरूवात ही ॐ श्री गणेशाय नमः ने होतो आणि कोणताही प्रकल्प ओम्नेच सुरू होतो. शुद्ध आचरणाने जर ज्ञानाची आराधना केली तर त्यातून अनुभवाचा जो एक दीर्घ ओंकार जन्माला येतो, त्याला वेदात आणि उपनिषदात 'ॐ' म्हटले आहे.



श्वासाचे सकारात्मक भान जसे ओम्मध्ये असते तशी आत्मविश्वासाची नवी ऊर्जाही त्यात असते. आपण बसल्या जागी सुद्धा सहज ओम्चा उच्चार करा. क्षणार्धात आपण नव्या विश्वात प्रवेश करतो. म्हणून गुरूकुलात ऋषीमुनी शिष्य व विद्यार्थ्यांना ज्ञानाचा प्रकाश देताना ओम्ने सुरूवात करीत. कुठलाही घरंदाज गायक गाण्याचा व स्वराचा आरंभ ओम्नेच करतो. स्वरातला आकार हाच ओंकार आहे. म्हणून संत एकनाथांनी म्हटले


**ओंकार स्वरूपा सद्गुरू समर्था**
**अनाथाच्या नाथा तुज नमो**

म्हणूनच संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत पहिले नमन करताना 'ॐ नमोजी आद्या' असे म्हटले आहे. समर्थ रामदासांनी दासबोधाच्या सुरूवातीला 'ॐ नमोजी गणनायका। सर्व सिद्धी फल दायका।। अज्ञान भ्रांतीछेदका। बोधरूपा।।' असे नमन केले आहे. निर्गुणाचं पहिलं सगुण रूप ज्या ठिकाणी दिसते तो हा ओंकार रूप गणेश, 'मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा.' निर्गुण उपासनेचा प्रारंभ ओंकारापासूनच होतो. म्हणजे श्रीगणेशाच्या उपासनेपासूनच होतो. सगळे तत्त्वज्ञानाचे ग्रंथ देखील ओम्नेच सुरू केले जातात.



ओम् हा उर्जा देतो. मनाला आश्वस्त करतो. वृत्ती निर्भय करतो. स्वच्छ प्रकाश देतो. उजेडाचे आत्मभान देतो. विश्वाचा अर्थ गवसण्याची बुद्धी देतो. पौर्णिमेच्या चांदण्यातला लख्ख प्रकाश होतो तर अमावस्येच्या चिंतनाची दिव्य नक्षत्रे होतो. समुद्राची गाज ओंकाराच्या अर्धमात्रेतून येते. समुद्राची गाज हा ओंकाराच्या मननाचा पाठ आहे. घनगर्द जंगलामधून सुसाट वाहणारा वारा सुद्धा जेंव्हा ओंकाराची शीळ घालतो तेंव्हा ईश्वरही अरण्यात आनंदाने डोलतो. दऱ्या-खोऱ्यातून घुमणारा अनाहूत नाद हे ओंकाराचे प्रात्यक्षिक आहे. म्हणून ओंकार साधनेतून ब्लडप्रेशर नॉर्मल होते. डायबिटीस काबूत राहतो. मणक्याचा आजार कधीही होत नाही. आपण जड न होता हलके राहतो. उमदेपणा आणि तरतरीत वृत्ती हे ओंकाराचे टॉनिक आहे. म्हणून ॐ आपल्या जीवनात आपण जपला पाहिजे असे वाटते.


भगवान कृष्णाला सांदिपनी ऋषींच्या आश्रमात पहिला धडा ओंकाराचाच मिळाला. म्हणून कृष्णाने गीतेचा आरंभही ओम्नेच केला. लोकमान्य टिळक यांनी गीतारहस्याची सुरूवातही ओम्नेच केली. तुरूंगात जेव्हा जेलरने त्यांना लिहिण्यासाठी पहिला कागद दिला तेव्हा त्यांनी त्यावर 'ॐ श्रीशय जनात्मने' असे लिहिले. याचा अर्थ परमेश्वर असलेला समाज ओंकारातून उर्जितावस्थेत येवो. पूर्णयोगी अरविंदानी 'सावित्री' नावाचे पहिले महाकाव्य लिहिताना पहिला शब्द ॐ हाच लिहिला. किंबहुना ॐ ही अनुभूती मला आल्यावरच सावित्री हे महाकाव्य सुचले असे त्यांनी स्वतःच लिहून ठेवले आहे. रामकृष्ण परमहंसांनी भगवतीची कापूर आरती केली. नैवेद्य दाखविला. प्रसाद ग्रहण करता करता रामकृष्णांची भावसमाधी लागे. त्या स्वप्नात त्यांना तेजाचा बिंदू दिसे. त्या तेजोशात ते अनेक ओम् अनुभवत नि भानावर आल्यावर ते जे बोलत, तसा




## ॐतत् सत् मधून विश्वव्यापार

*ॐकार हे अनादि परब्रह्म आहे. ते आरंभरहित आहे. जगाचे उत्पत्तिस्थान व विश्रांतिस्थान आहे. त्याचे नाव एक आहे. ते ब्रह्म नामविरहित व जातिविरहित आहे. अविद्येने असे ब्रह्म ओळखता येत नाही. म्हणून श्रुतींनी परब्रम्हाला 'ॐतत् सत्' असे म्हटले. ॐतत् सत् या तीन शब्दातून उत्पत्ती, स्थिती आणि लय निर्माण झाले. विश्वाचा व्यापार या तीन गोष्टीतून चालला. म्हणून ॐ हे पहिले अक्षर. तत् हे दुसरे आणि सत् हे तिसरे. ज्ञानदेवांच्या दृष्टीने 'ॐतत् सत्' या सुंदर फुलांचा उपनिषदे वास घेतात. जेव्हा या नामाशी सात्त्विकता जुळते तेव्हा ते सत्कर्म होते. या नामाशी राजसता जुळले तेव्हा ते राजस होते. हे कर्म तम वृत्तीतून जन्माला येते तेव्हा ते तमोगुणी होते. या क्रिया ॐकाराच्या साहाय्याने चालू होतात. ॐतत् सत् या पदाचे सामर्थ्य ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या १७ व्या अध्यायत वर्णिले आहे. या साऱ्याचा अर्थ एकच आहे आणि तो म्हणजे 'सत्कर्म योगे वय घालवावे' हा होय.*

अनुभव विवेकानंदाना येई. साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळालेले श्री. रविंद्रनाथ टागोर हे रात्री झोपेत बडबडत. झोपेतही ते ॐ ॐ करीत. एके दिवशी त्यांची आई त्यांना म्हणाली, ''तू झोपेत ओम् ओम् काय करतोस''. तेव्हा ते म्हणाले, ''मी नेणीवेच्या पातळीत आणि जाणीवेच्या पातळीतही ओंकारातच असतो. ओंकाराने माझा इतका ताबा घेतला आहे''. प्रख्यात अणु शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांनी तुर्भे येथे बांधलेले अणुशक्ती केंद्र शंकराच्या पिंडीच्या आकारासारखे आहे. त्याची पूर्ण रचना ओंकाराच्या आकाराची आहे. अणुच्या प्रत्येक चाचणीच्या वेळी डॉ. विक्रम साराभाई, डॉ. भाभा, माधवन् नायर हे सारे जण ओंकार म्हणून जात असत. ओंकार हा अंतरिक्षातला स्वर आहे आणि ते त्या अंतरिक्षाची प्रार्थना करीत. एवढा मोठा प्रभाव ओंकाराचा आहे.




कोणत्याही मंगल कार्याचा आरंभ आपण ओम्ने करतो. देवतेचे स्तोत्र म्हणताना त्याचा आरंभही ओम्ने होतो. हरि ओम् हा तर प्रत्येकाच्या तोंडी असणारा शब्द आहे. ओम् या आद्य स्वराने माणसाला चेतना मिळते. यातून माणूस पुढे जाऊन नवीन काही करू शकतो. चैतन्यातून नव्या नव्या कल्पना येतात. सृष्टीचा अर्थ कळू लागतो. यातून ओम् जन्माला येतो. शुद्ध आचरणाने घेतलेला ज्ञानगर्भ अनुभव याला वेदात आणि उपनिषदात ओम् असे म्हटले आहे. उपनिषदकारांनी याचे सुरेख वर्णन केले आहे. ज्ञानदेवांची तर ओमकडे बघण्याची दृष्टीच निराळी आहे. ओममध्ये सारी सृष्टी सामावते अशीच ज्ञानदेवांची भावना असल्यामुळे ते स्वतःही ज्ञानेश्वरीचा प्रारंभ ॐ नेच करतात. आचार, विचार आणि उच्चार या तिन्हीच्या अंतरंगातून जो हुंकार जन्माला येतो त्याला 'ओंकार' म्हणतात.!


श्री गणेशाचे ओम हे सगुण रूप आहे. आकारात श्री गणेशाचे चरण येतात. उकारात विशाल उदर येते आणि मकारात मस्तक येते. लेखनाचा मूळ श्री गणेशा आहे. तो विश्वाचे मूळरूप आहे. विवाहाच्या वेळी मुली गौरीहराची पूजा करतात. गौरीहराचा आकारही ओंकारातला आहे. ब्रह्मणस्पती म्हणजेच वेदकाळातला गणेश आहे. त्यातूनच ओंकार जन्माला आला. हा गणपती गणांचा प्रमुख आहे. व्यासांनी गणपतीच्या साहाय्याने 'जय' नावाचा ग्रंथ लिहिला.तेच महाभारत होय. यातून लिपीशास्त्र निर्माण झाले. लिपीतज्ज्ञ मा.श्री.अ.भ. वालावलकर आणि मा.श्री. एल. एस. वाकणकर यांनी चिन्हांवर अभ्यास करून अ+ऊ+म असे त्यांचे ध्वनीरूप मांडले. ते आज सर्वत्र अभ्यासले जात आहे.

संत ज्ञानदेवांनी ओंकाररूपी आत्मरूपाला विशेष वंदन केले आहे. ज्ञानेश्वरीत ओंकाराचा जयजयकार

**''ॐ माझ्या गाण्याचा प्राण आहे.''**

*–पंडित जसराज*





भाऊंची सकाळी नियमितपणे योग साधना

केला आहे. ओंकार हे निराकार परब्रह्माचे नादरूपाने व्यक्त झालेले प्रतीक आहे. ओंकाराचा उच्चार जरी झाला तरी मन टवटवीत होते. आपण आपल्या स्वतःशी हळूहळू बोलू लागतो. मनाची एकाग्रता होते. मन नम्र होते. याला ज्ञानदेव नमन म्हणतात. काहीजण त्याला मंगलाचरण म्हणतात. सुस्वरूपाची जाणीव होण्याला असे मन मदत करते म्हणून ते नमन असते. ओंकाराला केलेले नमन सर्व देवतांना भावते. हे नमन ब्रह्मणस्पती सूक्तात आहे. ब्रह्मस्पती हा महाहस्ती आहे. म्हणजे गजमुख आहे. दक्षिणहस्त उजव्या सोंडेचा आहे. वामहस्त डाव्या सोंडेचा आहे. असा हा ॐ गजानन विद्या आणि कला यांचा दाता आहे. तो ज्ञान देतो. कला संपन्न करतो. साऱ्यांना तप देतो. तो तेजस्वी आहे. त्यातून त्याचे सामर्थ्य प्रकट होते. गणेशाच्या बुद्धीनिष्ठेतून जे विश्व समजले, त्या विश्वाचा अर्थ ज्ञानदेवांनी आत्मरूपातून व्यक्त केला. म्हणून ओंकार हा ज्ञानाचा, कर्माचा, भक्तीचा उद्‌गाता ठरला. ओंमचे हे रुप सर्वांनी मान्य केले आहे.



ओंकाराची उपासना सर्व धर्मात आहे आणि सर्वांच्या प्रार्थनेतही आहे. त्या त्या धर्मातली नावे वेगळी असतील पण त्यातला अर्थ एकच आहे. आणि त्याचे परिणाम अनेकांनी शोधले आहेत. भारतीय परंपरेत ओम्‌ने सुरूवात करताना आपला संकल्प सिद्धीस जाणार असा विश्वास असतो. त्यातून आपल्या आद्य देवतांची आराधना आपण करतो. या आराधनेत सारी सृष्टी येते. सृष्टीतील पाने ओंकाराचेच रूप वाटते. सृष्टीतील तेजात ओम्‌चा ध्वनी ऐकू येतो. आकाशाची वृत्ती शब्दाशब्दातून प्रकटते. आकाशातील नक्षत्रे, ग्रह या सर्व गोष्टी आपण वाचू शकतो. कोणताही प्रकल्प पुढे नेण्यासाठी ओम्‌ हा धीर देतो. त्यामुळे मनाला विश्वास येतो. आपण काही तरी चांगले करीत आहोत याचे भान येते.




ती जाणकारांनाच सांगावी असे वाटते. कारण मनाच्या एकाग्रतेतूनच हे सारे कळत असते. शेतीतल्या प्रयोगातून येणारी सृजनता स्वच्छ मनांना जेव्हा साद घातले तेव्हा नव्या नव्या प्रकल्पांचे ओंकार जन्माला येता.

मनःपूर्वक केलेल्या कामातून असा ओंकार आपण होऊन प्रकटतो. असे मन शुद्ध ठेवण्यासाठी कायम ओंकाराची उपासना करावी लागते. मनावरली जळमटे काढून टाकावी लागतात. ज्ञानाचा दुरूपयोग कधीही करायचा नसतो. समाजाचे कधीही नुकसान करायचे नसते. जे काम करायचे ते जगाच्या कल्याणासाठी ही भावना ओंकारातून येते. इथे आपपर भाव उरत नाही. हे सारे सांभाळावे लागते. मनापासून केलेल्या एकाग्रतेला चांगली चालना मिळते. नवे आकलन होते. अभ्यासाची बैठक लाभते. सद्गुरू अचूक मार्गदर्शन करतात. शिष्याला नेमक्या वाटेवर मार्गदर्शन करतात. त्यासाठीची धडपड करावीच लागते. या धडपडीतून मनाच्या श्वासातल्या आनंदाच्या शब्दाला ओंकार म्हणतात. खरे तर ती आपलीच सावली असते. ती आपल्या श्वासात लपलेली असते. आपण जे काही चांगले काम करू त्यातून ती व्यक्त होत असते.

सहज उदाहरण आठवले. अर्जुनाच्या मनात सारखा प्रश्न येत होता तो म्हणजे माझ्या नातेवाईकांना कसे मारू? ज्यांनी मला विद्या दिली त्या माझ्या गुरूवर मी कसे आघात करू? या प्रश्नांनी अर्जुन घायाळ झाला होता. दुःखी होता. भगवान गोपालकृष्ण त्याला समजावून सांगत होते. ते तेवढ्यापुरते त्याला पटायचे परंतु

अध्यात्मात ओम् जसे आत्मज्ञानाचे भान देतो तसाच विज्ञानातला ओंकार निरीक्षणाशी मैत्री करतो. निरीक्षणातून परीक्षण येते. त्याची प्रचिती आल्याशिवाय विज्ञान सिद्ध होत नाही. ऋषी आत्मज्ञानाशी प्रामाणिक राहिले. त्यांनी त्याबाबतीत कधीही प्रतारणा केली नाही. ते त्यापासून ढळले नाहीत. अनुभवातून ते पुढे गेले. आत्मज्ञानातील 'स्व' त्यांनी घासून-पुसून स्वच्छ केला. विज्ञानातही पूर्वग्रहदूषित मन न ठेवता स्वच्छ मनाचा आरसा तयार करावा लागतो तरच आपल्याला सृष्टीमधला ओंकार ऐकू येऊ शकतो. मनापासून मन दिले की वाटा स्वच्छ होत जातात. अवघड वळणे आपली होतात. अशा वाटांवर आनंदाचे निर्झर निर्माण होतात. आभाळ आपल्या बरोबर असते. सूर्य आपला प्रकाशत असतो. अशा निरोगी वातावरणात, ज्ञानेश्वरीतला ओम आपल्याला आनंद देतो. दासबोध आपल्याला पुढे नेतो. गाथा जीवनाचे गाणे करतो. एकनाथी भागवत मन निवांत करते. आपल्या शुद्धतेचे आपल्यालाच आश्चर्य वाटते. मनाच्या आकाशात आपण स्वच्छंदपणे विहार करतो. अभ्यासू मार्गदर्शक आपले सांगाती होतात. प्रसन्नता आपल्या सभोवार बागडते. यातून निर्माण होणारी निर्मितीक्षमता सांगता येत नाही.



पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशी त्याची अवस्था होती. त्याला लढायचे नव्हते असे नाही. आपल्याच माणसांशी आपण कसे लढायचे! कृष्ण त्याला काळाचे भान देत होता. त्याच्या मनात चाललेला काळाचा गोंधळ बाजूला करीत होता. तेव्हा कृष्णाच्या लक्षात आले याच्या मनातून मोह नाहीसा झाला पाहिजे म्हणजे याला याच्या कर्तव्याची जाणीव होईल. त्याला होणारी अहंकाराची बाधा नाहीशी होईल. हे जेव्हा कृष्णाने त्याला सांगितले तेव्हा तो लढायला तयार झाला. संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत यावर सुंदर दृष्टांत दिला आहे. माउली म्हणतात,

''सूर्य आकाशात न कंटाळता नित्यनेमाने उगवतो आणि मावळतो. तो साऱ्या विश्वाला आपल्या किरणांनी प्रकाशित करतो. सृष्टी लखलखते. म्हणून प्रकाशाच्या संसर्गाने सूर्य बाधित होत नाही.'' तसा ओंकाराच्या सहवासात मनुष्य नव्या नव्या कामात आनंद घेत असतो. आपल्या कामात तो पूर्णपणे एकरूप होतो. बाकीच्या विषयांकडे त्याचे लक्ष नसते.''

विज्ञानाचे प्रयोग करणारे शास्त्रज्ञही याच वृत्तीचे असतात. इन्फोसिसच्या नारायण मूर्तींनी जे काही काम केले ती त्यांची ओंकाराची उपासनाच होती. आदरणीय मोठ्या भाऊंनी जी मोठमोठी कामे केली व प्रकल्प उभारले आणि अत्यंत विनम्र भावाने जी कामे तडीला नेली ते प्रत्येक काम हे ओंकाराचेच प्रतीक आहे. उन्हाच्या चटक्यांचे जो कधी कौतुक करीत नाही आणि सावलीमध्ये सगळ्यांना बरोबर घेऊन बसतो ते ओंकाराचे सुंदर प्रात्यक्षिक असते.

अर्जुनाला रणांगणावरील सेवा निरपेक्ष असते हे लक्षातच आले नाही. ही जाणीव भगवान गोपाल कृष्णांनी त्याला करून दिली. त्यातून त्याला नवे भान आले. आपण जेव्हा कुठलेही नवे चांगले काम करतो तेव्हा जे आत्मस्वरूपाचे नवे कोरे करकरीत भान येते तोच ओंकार असतो. यातून निर्णयशक्ती योग्य मिळते. त्याची प्रत्येक कृती चांगली होते. अशी कृती हीच विधात्याची स्वरूपे असतात. त्यांच्या मनातून चांगल्या कामांचा झरा सतत वाहत असतो. आपल्या कामांमुळे तो तहानभूक विसरतो. त्याला कोणतीही भीती सतावत नाही. त्याच्यातले सद्गुण त्याला पुढे नेतात. त्याला स्वतःला जे आवडते ते तो जगाला देतो. शाश्वत मूल्यांची प्रतिष्ठा हा त्याचा धर्म होतो. नीतिवर सदाचारावर आणि






## ओंकारातून जगण्याच्या सूत्राची जाणीव

*माझ्या गुणदोषांची जाणीव मला असणे हे जगण्याचे सूत्र आहे. ही जाणीव ओकार साधनेतून प्राप्त होऊ शकते. देह हे साध्य नाही, ते साधन आहे एवढे जरी कळले तरी जीवन वेगळे भासते. आश्रम त्यागाचे मंदीर होते. विहार मैत्रीचा संवाद होतो. अग्यारी प्रकाशाचे भान बनते. मशिदीचा गाभारा निर्गुणाचा अवकाश होतो. मंदिराच्या कळसावरला चंद्र तोच आहे आणि मशिदीवरला चाँदही तोच आहे. शंकराचार्यांच्या कोजागिरीचा चंद्र ज्ञानाची पौर्णिमा आहे तर पैगंबरांना पवित्र रमजानच्या द्वितीयेचा चंद्र आत्मज्ञानाच्या साक्षात्काराची तिथी वाटते. क्रुसावरले रक्त गुडफ्रायडेचे पवित्र तीर्थ बनते. भगीरथ प्रयत्न करून आणलेली गंगा पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करते. तीनही समुद्रांची अथांगता जिथे एकवटते तिथेच आधुनिक भारताची शक्ती स्वामी विवेकानंदाना कन्याकुमारीच्या रूपात दिसते. अणुचा होणारा पहिला स्फोट हा वेदांतातला ॐकार वाटतो. असे व्यापक बघणे म्हणजे दीपावली साजरी करणे.*

सज्ञनतेवर तो भर देतो. समाजाच्या शूद्र प्रतिक्रियांपुढे तो कधीही नमत नाही. काहीही न करता सतत काही ना काही बोलत राहायचे अशी काहींची प्रवृत्ती असते. तो त्याला कधीही भीक घालित नाही. कारण त्याच्या समर्पणाच्या भावनेतून त्याचा ओंकाराचा यज्ञ अखंड धगधगत असतो. यातून विश्वाला आनंद मिळतो. त्याला त्याच्या कामात पाहणे हे महत्त्वाचे वाटते.

उत्तम काम करणारी माणसे नेहमी आपल्या कामातून चिरंजीव राहतात म्हणून आजही ज्ञानदेवांचा नेवाशाचा पैसाचा खांब प्रतिमेचे स्वतंत्र आकाश वाटतो. तुकोबांचा भंडारा डोंगर जगण्याची उंची देतो. एकनाथांच्या पैठणमधली गोदावरी जीवनाला खोली देते. समर्थ रामदासांचा सज्जन गडावरील मैत्रीचा कडा जीवनाचे करूणाष्टक बनतो. ही सगळी ओंकाराची रूपे आत्मभानातून येतात. आत्मभानातून आलेले हे सारे जीवन मानवी मनाला सतत स्फूर्ती देते. जगण्याला सुंदरता देते. मानवी मनाला उदारता देते. संत ज्ञानदेवांनी विश्वाचे आर्त कवटाळले आणि पसायदानाचा प्रसाद दिला. संत तुकोबांनी 'गुण गाईन आवडी, हेची माझी सर्व जोडी' हे जीवनाचे सूत्र दिले. एकनाथांनी गरीब मुलाला कडेवर घेऊन श्रीमंत मानवी मन दिले. समर्थ रामदासांनी 'जनहित विवरी' असे म्हणून रामरायापाशी लोकांच्यावतीने प्रार्थना केली. यासाठी ओंकाराच्या मनाचे सामर्थ्य आजही आम्हाला महत्त्वाचे वाटते म्हणून ते आम्ही मुद्दाम नोंदविले आहे.



नव्या अंकाचा नवा आनंद ओम्‌ने सुरू करणे हे आम्हाला मोलाचे वाटते. यात दोन उद्देश आहेत एक, आपली कृषी संस्कृती मानवी मूल्ये जोपासणारी आहे. आणि दोन, आपली तीर्थे मनामनांची एकात्मता जोपासणारी आहे. म्हणून आमच्या दृष्टीने 'कृषितीर्थ' हे ओंकाराचेच एक रूप आहे असे आम्ही मानतो. ओंकाराला प्रार्थना करून आम्हास एवढंच सूचवायचं आहे की हे सर्वे श्वरा आम्हाला चांगल्या प्रेरणा दे, सद्‌बुद्धी दे. आमचा भारत अभेद्य ठेव. मोठ्या मनाने आम्ही 'कृषितीर्थ' सांभाळू. त्यासाठी तू आम्हाला आत्मबळ दे आणि आमच्या वाचकांनाही आत्मशक्ती दे! सर्वांना नमस्कार.

लेखन– डॉ. सुधीर भोंगळे



# ध्येयाचा ध्यास

दलिचंद ओसवाल

कृषिक्षेत्रात अर्थपूर्ण क्रांती करणाऱ्या द्रष्ट्या भवरलाल जैन उर्फ भाऊंनी जे कठोर परिश्रम केले आणि खऱ्या अर्थाने जळगावच्या जैन हिल्सवर जे सार्थ जागरण केले ते आजही आपल्याला व अनेकांना प्रेरणा देत आहे. या प्रेरणेतूनच अनेकांची आयुष्ये विकसित झालेली आहेत. त्यामुळे मोठेभाऊ हे मार्गदर्शनाचा दीपस्तंभ बनून गेले आहेत. १९३७ साली जळगाव जिल्ह्यातील वाकोद येथे शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. १२ डिसेंबर हा भाऊंचा जन्मदिन आहे. म्हणजे आज भाऊ हयात असते तर ८१ वर्षांचे झाले असते.

भवरलालजी माझे पुतणे होते आणि आम्हा दोघांचा सहवास त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत राहिला. आमच्या दोघांमधील जवळीक ही नाते–संबंधापेक्षाही घट्ट होती. आमचे ऋणानुबंध जन्मो–जन्मीचेच होते असं म्हणणं वावग ठरणार नाही. त्यांच्याबद्दल काय लिहू आणि काय नाही ह्याच्यातच माझे मन भरुन येते. भारतीय संस्कृतीत सहस्त्रचंद्र दर्शनाची सुंदर प्रथा आहे. कर्तृत्वशील माणसे कोजागिरी पौर्णिमेचा चंद्र जेव्हा ८०व्या वर्षी पाहतात त्याला 'अमृतयोग' म्हणतात. हा अमृतयोग महाभारतातील थोर पितामह भीष्माचार्य यांचा भगवान गोपाल कृष्णांच्या संयोजनाखाली साजरा झाला. यावर महर्षी व्यासांनी महाभारतात श्रीकृष्णाचे अर्थपूर्ण पण थोडक्यात भाषण दिले आहे. त्याचा सारांश असा –

''सतत चिंतनातून जे काही नेतृत्वदर्शी कार्य जी व्यक्ती करते त्याला अलौकिक यश असे म्हणतात. यासाठी त्या व्यक्तीला कितीतरी प्रकारचे व विविध स्वरूपाचे उन्हाळे, पावसाळे आणि हिवाळे पाहावे लागतात. अशा व्यक्तिंच्या जीवनात संकटांचे भूकंप होतात. परंतु अशा महनीय व्यक्ती संकट हे सुद्धा वरदान आहे असे मानतात. त्यातून त्यांना जगण्याची एक अपूर्व खिडकी निर्माण होते आणि त्यातून ते आपल्या कर्तृत्वाच्या विकासाकडे व भारलेल्या स्वप्नाकडे गगनभेदी झेप घेतात. ही झेप राष्ट्राच्या व समाजाच्या उन्नतीला, प्रगतीला, वाढीला व कल्याण साधण्याला नेहमीच मदत करणारी असते.'' भाऊंना किती तंतोतंत लागू होणारे हे भाषण आहे.

ज्या भीष्माचार्यांनी आयुष्यभर कौरवांची चाकरी केली ते कौरवांच्या बाजूने मात्र कधीच नव्हते. त्यांची संपूर्ण सहानुभूती पांडवांकडे होती. आपण कौरवांची चाकरी करीत आहोत याचे वर्णन ते 'आपल्या प्रारब्ध योगात आहे' अशा शब्दात करीत. तरीही भीष्मांनी कौरव–पांडवांची एकी घडवून आणण्याचा प्रयत्न शेवटच्या श्वासापर्यंत केला. या करिता आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावले आणि त्यातून त्यांनी जगण्याचे जे रमणीय चांदणे अनुभवले त्याला 'सहस्त्रचंद्र दर्शन' म्हणतात.

भाऊंनी कर्तृत्वाची प्रेरणा त्यांच्या आईपासून घेतली. त्यांच्या आईने त्यांना व्यवहार आणि कष्ट यांची दिशा दाखविली. नवीन स्वप्ने पहायला शिकविले. ही स्वप्न प्रत्यक्ष कृतीत उतरावीत यासाठी नवनवीन विचार व ज्ञानाचे बळ भाऊंच्या पंखात भरले. त्या आधारे भाऊ आयुष्यभर स्वप्नांचा ध्यास घेऊन ती प्रत्यक्ष भूतलावर अवतरावीत यासाठी धडपडत राहिले. ज्ञानोपासना करीत राहिले. ज्ञान ही एक साधना आहे याची प्रखर जाणीव भाऊंना असल्यामुळे शेवटच्या श्वासापर्यंत ज्ञान साधनेतून ते स्वतःला तपासत राहिले. जसलोक रूग्णालयाच्या खाटेवरही त्यांनी पवार साहेबांच्या व्यंग व अर्कचित्रांचे 'दिशा' हे पुस्तक वाचून काढले आणि ३५० वर्षांचा अर्कचित्रांचा इतिहास वाचून भारावून गेले.

ज्ञानाची अखंड कास धरून भाऊ स्वतःचा 'स्व' शुद्ध करीत राहिले. आसपासच्या निरीक्षणातून स्वतःला शोधत राहिले. हा शोध अथक होता. तो सतत सुरू होता. त्यामुळे येणारा प्रत्येक दिवस त्यांच्यासाठी नवा होता. त्यातून त्यांचा विविध विषयांचा अभ्यास व व्यासंग वाढत गेला. अभ्यासाच्या जाणिवा व्यापक झाल्या. सर्जनशील निर्मितीच्या कामात व आवडणाऱ्या विषयात ते रस घेऊ लागले. विषयाच्या तळाशी जाऊ लागले. त्यातून जाणिवा समृद्ध झाल्या. समोरचा माणूस त्यांच्या अभ्यासाने व ठाम विचारांनी भारावला. त्यांची परखड मतेही अनेकांना आपलिशी वाटू लागली. खरा, निस्वार्थी व कटू सल्ला घेण्यासाठीही भाऊंकडे लोकांची गर्दी होऊ लागली. ही गर्दी टिकवून ठेवण्यासाठी, वाढण्यासाठी खोटं बोलण्याची, लोकानुरंजनी स्तुतिपाठकाची भूमिका त्यांनी कधीच स्वीकारली नाही. त्यामुळे भाऊ कधीकधी फार परखड व फटकळ आहेत असे वाटायचे. अर्थात ते तसे होतेही. पण त्यांच्या परखड व फटकळ स्वभावाला प्रेमाची, आपलेपणाची व जनकल्याणाची जरतारी किनार होती. भाऊंच्या या वागण्यामागेही त्यांची उपासना होती, स्वानुभव होता आणि लोकांच्या व राष्ट्राच्या वाढीचे चिंतन होते. उपासना ज्ञानाला पूरक असते. कर्माची परिसमाप्ती ज्ञानात होते.

ज्ञानाशिवाय कर्म व कर्माशिवाय ज्ञान असू शकत नाही. ज्ञानाशिवाय कर्म आंधळे ठरते. कर्माशिवाय ज्ञान पांगळे ठरते. ज्ञानाला व कर्माला उपासनेची जोड नसली तर ते ज्ञान यांत्रिक ठरते. असे शुष्क ज्ञान माणसाला एकाकी पाडते याची पुरेपूर जाणीव भाऊंना असल्यामुळे त्यांची ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा यांचा सुंदर व उत्तम संयोग होऊन उत्कृष्ट अशी जीवननिष्ठा निर्माण झाली होती. निष्काम कर्मामुळे त्यांचे मन शुद्ध होते. असे मन आत्मज्ञानाला जवळचे ठरते आणि ज्ञानात प्रेम असले की त्याचे रूपांतर भक्तीत होते. भाऊंनी आयुष्यभर शेती आणि शेतकऱ्यांचीच भक्ती केली. विशेष म्हणजे त्याचा वसा, वारसा आणि बाळकडूही आईकडूनच मिळाले.

आईने भाऊंना महत्त्वाची जाणीव करून दिली की पैसा आणि प्रतिष्ठेच्या मोहात न पडता आपल्या शेतकरी बांधवांचे जीवन सुखी कसे होईल याचा अभ्यास करावा. यातून भाऊंच्या आईने त्यांना अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकान्त या मूल्यांचा



**भाऊ आपले वडील हिरालाल जैन, मातोश्री गौराई आणि पत्नी कांताबाई यांच्या समवेत**



कांताई बंधारा बांधून पूर्ण झाला आणि पहिल्याच वर्षी मोठा पूर आला तो पाहताना भाऊ. अर्ध्यातासानंतर भाऊ उभे राहिले होते ती जागाही पुरात वाहून गेली. मात्र भाऊंनी साकार केलेला कांताई बंधारा अभेद्यच राहिला.

परिचय करून दिला. पैसे सगळेच मिळवितात. पैशाने कधीही माणूस लक्षात राहात नाही. परंतु जो कर्तृत्वाचा हिमालय आपल्या आयुष्यात उभा करतो त्याची सावली समाज शतकानुशतके जपतो. असे आयुष्य इतरांना आकार देते. जगण्याचे सकारात्मक भान देते. आपल्या लोकांच्या सदुपयोगी पडल्याने आपल्या जगण्यात विनम्रता येते. हा जीवनाचा मोरावळा आईने भाऊंना दिला. भाऊंनी तो मनापासून जपला आणि दुष्काळी भागातील जमिनीचा, शेती व शेतकऱ्यांचा उत्तम अभ्यास केला.

पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब न थेंब अडवून, साठवून, जमिनीत मुरवून कसा वापरता येईल याचा बारकाईने विचार करून, पूर्णपणे शास्त्रीय पद्धतीने 'माथा ते पायथा' या तत्त्वाधारे जळगावच्या जैन हिल्सवर जगाला आदर्श ठरेल अशा पद्धतीने एकात्मिक पाणलोट विकासाचे 'मॉडेल' उभे करून दाखविले. एवढेच नव्हे तर ज्या ठिकाणी कच्च्यामालाचे उत्पादन होते, तिथेच त्यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करून, स्थानिक मनुष्य तिथल्या तिथंच रोजगारात सामावून घेणं हे पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाचे जे अंतिम व मूळ उद्दिष्ट आहे ते भाऊंनी प्रत्यक्षात कृतीत उतरवून दाखविले. जैन हिल्सवर पिकणारा आंबा, पांढरा कांदा, मोसंबी, पेरू यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी जैन व्हॅलीत उभी केली व हजारो तरुणांना रोजगार दिला.

कांताई बंधाऱ्याची निर्मिती करून भाऊंनी जलसंपदा विभागात आणि 'पाणी' या विषयात काम करणाऱ्यांसाठी नवे 'प्रारूप' निर्माण केले. हा बंधारा म्हणजे कृषी आणि जल क्षेत्रातील महाराष्ट्रातील अभिनव प्रकल्पाचा प्रयोग आहे. हा बंधारा टाकरखेडा येथे जैन इरिगेशन कंपनीच्या मुख्य कार्यालयाजवळ आहे. त्यातून अनेकांची शेतीची, पिण्याच्या पाण्याची सोय झाली. मुक्या जनावरांनाही पोटभर पाणी उपलब्ध झाले. आजच्या दुष्काळाच्या काळात तर हा बंधारा लोकांसाठी केवढा दिलासा देणारा आहे हे शब्दांत सांगता येत नाही. व्यापक कल्याणासाठी बंधाऱ्याचं स्वप्न भाऊंनी पाहिले. ते प्रत्यक्षात उतरावं यासाठी कोट्यावधी रुपये खर्च केले. नवं साहित्य व नव तंत्रज्ञान वापरलं. त्यांच्या स्वप्न बघण्यात जिवंतपणा होता. कर्तृत्वावरचा विश्वास स्वप्नातून ठाम व्हावा लागतो हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. ज्याच्या कर्तृत्वाच्या यशोपताका दाहिदिशांना डौलाने फडकतात, त्याच्या स्वप्नांची पूर्तता यात असते.


स्वप्न पडावीच लागतात. पडलीच पाहिजेत. स्वप्न म्हणजे भावी सूचनांचे सोनेरी दव. स्वप्न म्हणजे मनाला सुंदर विचारांची नि आचारांची उभारणी देणारे घर. स्वप्न म्हणजे क्षितिज कवेत घेण्याची क्रियात्मक झेप. बाकी स्वप्नांच्या व्याख्या मानसशास्त्रज्ञ काहीही करोत; परंतु मानवी मनाला उभारी

देण्यात ज्या काही जाणिवांसोबत असतात, त्यात स्वप्नांचा वाटा मोठा आहे. संवेदना असलेल्या मनालाच चांगली स्वप्ने पडतात. चांगली, भव्य स्वप्ने बघायला बहुधा सुकृत लागते. ते आई-वडिलांच्या मोठ्या पुण्याईमुळे भाऊंच्या वाट्याला आले होते. त्यामुळेच एका जन्मात एवढा प्रचंड कर्तृत्वाचा डोंगर ते उभा करू शकले.

महात्मा गांधीजींनी दिलेल्या ग्रामजीवनाच्या बाबतीत जो महत्त्वाचा विचार आहे तो म्हणजे ग्रामीण भागातील समस्या जाणून त्या आपण मनापासून सोडविल्या पाहिजेत. ही महात्माजींची तळमळ भाऊंनी प्रत्यक्षात साकार करून दाखविली. शेतीसाठी लागणारी छोटी छोटी अवजारे त्यांनी अत्यंत कल्पकतेने तयार केली. हेच भाऊंचे कृषितीर्थ होते. यातून त्यांना गांधीतीर्थाची प्रेरणा निर्माण झाली. भारतीय परंपरेत तीर्थ म्हणजे मनाची शुद्धी होय. ते नुसते पाणी नसते. पाण्यात निर्माण केलेला तो पंचामृताचा संस्कार असतो. तीर्थाला पंचामृत म्हणतात. पंचामृत म्हणजे केवळ दूध, दही, मध, तुप आणि साखर या वस्तु नव्हेत. ती जगण्याच्या अमृततत्त्वाची पाच कर्तव्ये आहेत. सेवा, करुणा, शांती, विनम्रता आणि सामाजिक बांधिलकी या सगळ्यांनी मिळून तीर्थ होते. जिथे जिथे नद्यांचे संगम आहेत ती ती सारी तीर्थे डोळ्यांसमोर आणा. भारतीय मनाचे खरे दर्शन तीर्थातून होते. म्हणून भाऊंनी महात्माजींचे जगातील सर्वोत्तम स्मारक जे जळगावात उभारले त्याला 'गांधीतीर्थ' हे नाव दिले आणि योगायोगाची गोष्ट अशी की जैन इरिगेशनने शेती, पाणी या विषयावर सुरू केलेल्या मासिकालाही भारत सरकारने 'कृषितीर्थ' हेच नाव दिले.

भारतीय मनाने विश्वाला 'हे विश्वची माझे घर' असा संस्कार दिला. 'दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मे पाहो', ही जाणीव दिली. आणि मुख्य म्हणजे सकारात्मक योगदानाचे फार महत्त्वाचे संरक्षण तीर्थांनी केले. पद्मश्री भाऊंनी या अर्थाने केलेली भारतमातेची पूजा हेच त्यांचे स्मरण आहे. खरं तर त्यांचे स्मरण होत नाही असा एकही दिवस जात नाही. कोणतेही काम करायला सुरूवात केली की आज भाऊ असते तर काय म्हणाले असते हा विचार जैन इरिगेशन परिवाराशी संबंधित असलेल्या सगळ्यांच्या मनात डोकावतोच. वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांची प्रकर्षाने आठवण झाली. वाढदिवस केवळ जन्माच्या तारखांनी मोजायचा नसतो. संबंध वर्षात माझ्याकडून नवीन काय झालं ते बघायचं. त्याचा लेखाजोखा मांडायचा. भाऊ हाच विचार शेवटपर्यंत जपत राहिले.

विदेशी कृषी शास्त्रज्ञांना त्यांनी जैन हिल्सवर बोलाविले आणि देशात नामवंत समजली जाणारी जैव तंत्र प्रयोगशाळा त्यांनी जळगावात उभी करून दाखविली. आजही या प्रयोगशाळेतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन होते आहे. जगात



आपल्या आदर्शांच्या सावलीत बसणेही किती आनंददायी असते ते शब्दांत सांगता येत नाही.

कुणालाही आंब्याचे टिश्यूकल्चर करणे जमलेले नाही. ते काम या प्रयोगशाळेतल्या शास्त्रज्ञांनी करून दाखविले आहे आणि त्याच्या चाचण्या घेण्याचे काम सध्या जैन हिल्सवर चालू आहे. केळी, डाळिंब, स्ट्रॉबेरी, मोसंबी, स्वीट ऑरेंज या पिकांचा उत्तम अभ्यास करून, त्याची ऊतीसंवर्धन पद्धतीने रोपे बनवून, या पिकात डोळे दिपविणारी वाढ भाऊंनी शेतकऱ्यांना शिकविली, नव्हे नव्हे प्रचंड वाढीव उत्पन्नाच्या रूपाने त्यांना ती मिळवून देऊन त्यांचा संसार सुजलाम् सुफलाम् केला. म्हणूनच आज विश्वात भाऊंचा गौरव 'भूमिपुत्र' आणि 'दूरदृष्टीचा उद्योजक' या शब्दात होऊन जगाने त्याला मान्यता दिली आहे.

भाऊ साधेपणाने जगले. परंतु साधेपणा याचा अर्थ गबाळेपणा नव्हे. आहे त्या परिस्थितीत नीटनेटकेपणाने राहणे हे भाऊंचे ब्रीद होते. भाऊंनी रक्ताचे पाणी करून शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि आपल्या संस्कृतीचे अधिष्ठान आहे याचे भान दिले. प्रत्येक क्षेत्रात भाऊंनी आपल्या व्यक्तित्वाचा ठसा उमटविला. मोठे मोठे प्रकल्प उभे केले. परंतु आपल्या मातीशी असलेली नाळ कधी त्यांनी तोडली नाही. एकदा पेट्रोल पंपावर भाऊ उभे असताना स्कॉटिश मिशनचे बोअर घेणारे एक रिग मशिन पंपावर आले होते. त्या मशिनच्या गाडीवर एक वाक्य लिहिलेले होते. ते वाक्य भाऊंनी वाचले. वाक्य असे होते 'ॲग्रिकल्चर अ प्रोफेशन विथ फ्युचर'. या वाक्याने भाऊंच्या मनावर खोल परिणाम केला. त्यांनी पुन्हा जोमाने कामाला सुरुवात केली.

छोट्याशा गावातील ते एक ग्रामीण उद्योजक होते. त्यांनी उद्योगधंदे इतके वाढविले की दहा हजार कोटींच्या पुढे उलाढाल जाऊन राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळून ३० हून अधिक कारखाने उभे राहिले. आयुष्यात त्यांनी आपल्या एकाही सहकाऱ्याला कधीच काढून टाकले नाही. अडचणीतल्या अनेक व्यक्तिंना भाऊंनी कायम मदतीचा हात दिला. भाऊंचा हात हा केवळ दानासाठीच होता. नवनवीन उद्योग करतानाही त्यांची सामाजिक बांधिलकीसुद्धा अत्यंत तत्पर होती. फक्त नफा उकळणे हे भाऊंचे कधीही उद्दिष्ट नव्हते. समाजावर सुसंस्कार करून संस्कृतीगर्भ परिणाम उद्यम क्षेत्रात झाला पाहिजे हा त्यांनी अखंड दृष्टिकोन ठेवला आणि त्यातून समाजातील सामान्य लोकांचे भले करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. कोटीच्या






## भाऊंचे जगणे म्हणजे कैवल्याचे चांदणे

*जीवनाचा खोलवर विचार केलेली माणसे फार थोडी असतात. आता जन्माला आलो आहे तर जगावेच लागेल म्हणून रडतकढत दिवस काढणारे बहुसंख्य असतात. अशांच्या जीवनात 'राम' नसतो. ते खायला काळ अन् भुईला भार असतात. पण फार थोडी माणसे आपल्या जीवनाचे महत्त्व समजून ते सार्थकी लावण्याचा प्रयत्न करतात. विचारपूर्वक आणि कठोर शिस्तीने स्वतःचे जीवन उभे करून इतरांच्या जीवनाला उभारी देऊन त्यांच्या आयुष्यात समाधानाचे चांदणे उभे करतात. अशा मोजक्या व्यक्तीत भवरलाल भाऊंचा समावेश आहे. जन्माला येणे म्हणजे जीवन नव्हे. जगण्याचा भावार्थ नीट समजून घेऊन त्याप्रमाणे वाटचाल करणे याला जीवन म्हणतात. माणसाला चांगल्या गुणांनी जगता आले पाहिजे. गुणांची जोपासना ही देवदुर्लभ बाब आहे. चांगले सगळे कळत असते. कारण भाऊंसारख्या माणसांचा प्रत्येक दिवस नित्य नवा आणि जागृतीचा असतो. अशा व्यक्ती किती वर्षे जगल्या यापेक्षा त्यांचे जगणे हे समाजाला वरदान असते. त्यांच्या जगण्यातून व जीवनातून समाजाला आपल्या वाटा सापडतात. संत तुकारामांनी म्हटले आहे, ''संसाराच्या नावे घालुनिया शून्य। वाढता हा पुण्यधर्म केला।।''. भाऊ ७९ वर्षे जगले. कार्याचा प्रचंड डोंगर उभा केला. स्वतःचे जीवन घडवून इतरांच्या जीवनात कैवल्याचे चांदणे फुलविण्यासाठी प्रचंड कष्ट घेतले. सखोल अभ्यास केला. वेळेची तमा न बाळगता पहाटे पाच ते रात्री ११-१२ पर्यंत सतत काम, चिंतन, संवाद याचाच ध्यास घेतला. लोकांना सावली देऊन स्वतःच्या अंगावर उन्हाच्या झळा घेतल्या. 'हे मी केले', असा आरडाओरडाही कधी केला नाही. आपल्या उद्धारातून लोकोद्धाराची कळकळ अखंड बाळगली. त्यामुळे भाऊंचा सहवास हा एक अलौकिक अनुभव होता.*



गावातील वडाच्या झाडाखाली टाकलेल्या बाजेवर बसून ग्रामस्थांना आश्वस्त करताना भाऊंना जे विचार सूचत ते त्यांच्या ग्रामीण विकासासंबंधीच्या पुस्तकात तंतोतंत उतरले आहेत.

कोटी उड्डाणे भाऊंनी घेतली परंतु जैन इरिगेशन विदेशातही मान्यता पावेल असेच काम ते करीत राहिले आणि त्यांच्यानंतर त्यांची मुलेही त्याच विचारांवर चालून तिच परंपरा व धारा पुढे वेगाने नेत आहेत.

आजही जैन इरिगेशनची जगभर मिळून ३० उत्पादन केंद्रे आहेत. ठिबक-तुषार सिंचन साहित्याची निर्मिती, पीव्हीसी पाईप, एच.डी.पी.ई पाईप, शेतीमालावर प्रक्रिया, सौर उर्जा पंप, सेंद्रीय जैविक खते, ऊती संवर्धन रोपे व रोपवाटिका, हरितगृहे व पॉलिहाऊसची उभारणी, फोमशीटस् असे एक ना अनेक उद्योग नावारूपाला आले आहेत. हॉर्वर्ड बिझनेस स्कूलने जैन इरिगेशनच्या कार्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे हे फार मोलाचे होते. विशेष म्हणजे 'चेंज द वर्ल्ड २०१५' च्या यादीत ५१ कंपन्या त्यांनी निवडल्या होत्या. त्यात जैन इरिगेशन ही एकमेव भारतीय कंपनी सातव्या स्थानावर होती हे लक्षात घ्या. अमेरिकेतील नेब्रास्का विद्यापीठात भाऊंच्या नावाने 'वॉटर फॉर फूड कोलॅबरेटीव्ह प्रोग्रॅम' हा कार्यक्रम आजही यशस्वीपणे चालविला जातो. असे अनेक वेगवेगळ्या विषयांचे अभ्यासक्रम



टिश्यू कल्चर रोपांचे अवलोकन

निरनिराळ्या विद्यापीठांमधून चालावेत म्हणून भाऊंनी निरनिराळ्या 'चेअर्स' निर्माण करून विद्यापीठांना भरीव रकमा दिल्या. यामागे मुख्य प्रयोजन म्हणजे अज्ञान संपवून माणसाने ज्ञानी व्हावे हे आहे. मनुष्याला ज्ञान मिळाल्याने तो विचारी होतो. त्याचे आचरण वेगळे होते. तो खऱ्या सुखाच्या मागे लागतो यावर भाऊंची गाढ श्रद्धा होती. ज्ञानात खूप मोठी शक्ती आहे याची त्यांना जाणीव होती.


फ्रान्सिस बेकन या तत्त्वज्ञाचे 'Knowledge is power to make man happy. If it cannot make man happy it is not knowledge', हे वाक्य सांगून भाऊ नेहमी म्हणत, ''माणसाने आपल्या समग्र जीवनाचा आढावा घ्यावा. त्यातून सत्याच्या वाटा शोधाव्यात. सत्याचे ज्ञान करून घ्यावे. जे कधीही बदलत नाही ते सत्य. सत्य हे नित्य आणि अविकारी आहे. सत्याचा विचार करण्यासाठी सूक्ष्म आणि साग्राही बुद्धी लागते. अशी बुद्धी असलेल्या माणसांना विवेकी म्हणतात. असा विचार सगळ्यांना जमतोच असे नाही. यासाठी बुद्धी तयार करावी लागते. तर्कशुद्ध विचार अभ्यासावा लागतो. ज्ञानाची कास धरावी लागते. ज्ञान म्हणजे

विचार. योग म्हणजे आचार. जसा आचार तसा विचार. हे जग अनादि आहे. पूर्णपणे सिद्ध आहे. या जगात प्रत्येक गोष्ट सहजपणे होते. हा जगाचा स्वभाव आहे, तर मग उगाच का शोक करीत बसतोस? दृश्य निर्माण होणे आणि दृश्य विलय पावणे, हा सगळा भ्रम आहे. जे जे आपण बघतो, ते ते नाहीसे होते. बघावे तर दिसते आहे. दिसतादिसता नाहीसे होते आहे. हे या जगाचे स्वरूप आहे. ते आपण ओळखले तर माणसाला सुख आणि दुःख नेमकेपणाने कळेल.''

शिक्षण हा मानवी संस्कृतीचा प्राण आहे असे भाऊ मानत. सुसंस्कारित शिक्षण मुलांना मिळालेच पाहिजे ही त्यांची धारणा होती. त्यातूनच त्यांनी दारिद्र्यरेषेखालील व गरीब मुलांसाठी जळगावात अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूलची स्थापना

## विज्ञानाची अखंड उपासना

*भाऊंनी अंधश्रद्धा कधीही जोपासली नाही कायम विज्ञानाची कास धरली. नवनवीन विज्ञान व तंत्रज्ञान शेतकऱ्यांनीदेखील स्वीकारले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. जगात नवीन काय संशोधन होतंय याचा ते सतत शोध घेत होते. विज्ञानाच्या उपासनेमुळे त्यांचा व्यवहार व संवाद ज्ञानविज्ञान युक्त होता. विज्ञानातून त्यांना सृष्टीचे भौतिकज्ञान झाले. विज्ञानाची उपासना केल्याने ध्यानगर्भ बुद्धीचा विकास झाला. ओजस्वी बुद्धीच्या योगामुळे त्यांचे ऐहिक आचरणही उत्तम व्यवस्थित होते. यातून ध्यानाला व ध्येयाला खोली मिळाली. त्यामुळे त्यांच्या अभ्युदयाचा आणि निःश्रेयसाचा मार्ग सुकर झाला. जीवनात ज्ञानविज्ञान सामावलेले असल्यामुळे त्यांचे जीवन श्रेष्ठ प्रतीचे व मोठ्या उंचीचे झाले. विज्ञानामुळे त्यांचे जीवन श्रेष्ठ प्रतीचे व मोठ्या उंचीचे झाले. विज्ञानामुळे भौतिक बल वाढले. विज्ञानात जी वारंवार प्रयोगशीलता आढळते ती भाऊंच्या जीवनात पदोपदी आढळून येते. प्रत्येक गोष्ट ज्ञानविज्ञानाच्या कसोटीवर तपासून पाहण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे कामात बोलण्यात प्रचंड पारदर्शकता, खुलेपणा व धारदारपणा आला होता. विज्ञानाने काही बाबतीत नीतीमान झाले पाहिजे. शोधातून राक्षसी प्रवृत्ती वाढता कामा नये. नवनवीन शोधातून समस्त मानव जातीचे कल्याण झाले पाहिजे याकडे त्यांचे बारकाईने लक्ष होते. विश्वबंधुत्वाला विज्ञान उपयुक्त ठरावे याकरिता त्यांनी शेतीत अनेक प्रयोग केले. सूक्ष्मसिंचनाचे त्यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान हा त्यातलाच एक भाग आहे हे बारकाईने पाहिले तर आपल्या लक्षात येईल.*



अखंड वाचन, चिंतन, मनन आणि प्रयोगशीलता

करून मुलांची मोफत शिक्षणाची सोय केली. ८१ हजार चौरस फुटावर निर्माण केलेले गांधीतीर्थ हे विश्वातले मानांकन झाले आहे. पाहणारे थक्क होतात आणि तेथील व्यवस्थापनाने धन्य होतात. स्पोर्टस् अकादमीतर्फे भाऊ गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देत. त्यांना खेळण्यासाठी व प्रशिक्षणासाठी पगार देत. कलाक्षेत्रातही भाऊंचे सहकार्य प्रचंड महत्त्वाचे होते. ग्रामीण समाजाच्या प्रबोधनासाठी भाऊंनी 'कांताई ग्रंथालय' जसे सुरू केले तसे सर्वसामान्यांच्या डोळ्यांवरील उपचारांसाठी 'कांताई नेत्रालय' सुरू केले. भाऊंनी सुरू केलेले साहित्य क्षेत्रातील बालकवी, कवयित्री बहिणाबाई चौधरी आणि कविवर्य ना. धों. महानोर पुरस्कार आज सर्वत्र परिचित आहेत. डॉ. अप्पासाहेब पवार सूक्ष्मसिंचन व कृषी तंत्रज्ञानातील पुरस्कार सुरू करून भाऊंनी आपल्या जिवलग मित्राची आठवण जिवंत ठेवली आहे. दर दोन वर्षांनी होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्याची शेतकरी मोठ्या आतुरतेने वाट पाहतात यापेक्षा आणखीन दुसरे कोणते भाग्य पुरस्काराला लाभावे?

पर्यावरणाचे महत्त्व सर्वच धर्मांमध्ये आहे. धर्मगोळी, निसर्गाला जपण्यासाठी माणसाचा जन्म आहे असे सांगते. निसर्गाची विविधता म्हणजे माणसाच्या चिंतनशीलतेची विकास प्रक्रिया आहे ही भाऊंची श्रद्धा होती. म्हणून भाऊंनी वनीकरण, पाण्याचे पंप, सौरदिवे, ठिबक सिंचन, फळबागा उभारणी, पंपिंग यंत्रणा आणि विविध प्रकारच्या पाईप्सची व बायोफर्टिलायझरची निर्मिती करून त्यातून पर्यावरण सांभाळले. जैन हिल्स्वर आज जी लाखो हिरवीगार झाडे आहेत ती पाहून मनाला आनंद होतो. तेथील वातावरणच भाऊंचे पर्यावरणीय प्रेम सिद्ध करते.

भाऊंची स्मरणशक्ती अचूक होती. लेखन-वाचनाचा दांडगा व्यासंग होता. एकाच शब्दाला निरनिराळे पर्यायी शब्द व ते सुद्धा निरनिराळ्या भाषेतले शोधून काढून ते वापरण्याचा त्यांना निदिध्यास होता. संदर्भासाठी विविध प्रकारच्या डिक्शनरी, संदर्भग्रंथ भाऊंनी सातत्याने पाहिले. त्या त्या विषयातल्या तज्ज्ञांशी, अनुभवी लोकांशी, अभ्यासकांशी चर्चा-संवाद नियमितपणे साधला. चिंतन-मनन-कृती शिवाय त्यांचा एकही दिवस गेला नसेल. पर्यायी शब्द मिळविण्याबरोबरच त्यांचा विवेकीपणे वापर करण्यात भाऊंचा हातखंडा होता. त्यांची शब्द श्रीमंती देखणी व हेवा वाटावा अशीच होती. सततच्या अभ्यासामुळे चपखल व कोंदणात बसतील असेच शब्द वापरण्यामुळे ते कधी शब्दप्रभू बनले हे लक्षातच आले नाही. बुद्धी आणि विवेक या दोन्हींचा उत्तम समासमा संयोग भाऊंच्या ठिकाणी झाला होता. या दोन्हीतला भेदही त्यांना पूर्णपणे उमगलेला होता. त्याचे दर्शन त्यांच्या वागण्या-बोलण्यातून होत असे. नित्यानित्य विवेक महत्त्वाचा आहे. बुद्धीपेक्षा विवेकाचे सामर्थ्य आहे. बुद्धीत आकलनाचे काहीसे सामर्थ्य दिसते. विवेकात पृथःकरणाला महत्त्व आहे. बुद्धी धारणेशी निगडीत आहे. विवेक चिंतनाशी संबंधित आहे. बुद्धी विजेसारखी आहे. विवेक समईसारखा आहे. बुद्धी कधी कधी



### भाऊ म्हणजे पौर्णिमेचा चंद्र

*संत ज्ञानदेवांनी अमृतानुभवाच्या ७ व्या प्रकरणात ''जग असे की वस्तुप्रभा'' असे स्वच्छपणे सांगितले आहे. म्हणजे सतत बदल हा जगाचा आणि जीवनाचा स्थायीभाव आहे. म्हणून जग हे क्षणभंगुर नसून सतत परिवर्तनशील आहे. परिवर्तनामुळेच विश्व प्रवाही वाटते. विश्वात होणारे परिवर्तन हवेहवेसे वाटते. यासाठी भवरलाल भाऊंनी अहोरात्र धडपड केली. 'मी जन्माला येताना जशी भूमी होती त्यापेक्षा मी ती सुंदर करून सोडीन' असे व्रत अंगी बाणवून आयुष्यभर भाऊ चंदनासारखे झिजत राहिले व नवनवीन गोष्टी उभ्या करीत राहिले. भाऊ म्हणजे पौर्णिमेचा चंद्र होते. चंद्राच्या पूर्ण गोलाकार खोलीत सर्व प्रकारची वादळे थंड होतात. उधाणलेल्या समुद्रात जीवनाचे इंद्रधनुष्य स्वच्छंदाने बागडते. चंद्राच्या प्रकाशात अंतर्बाह्य सृष्टी उजळते. समुद्राच्या लाटेवर दिशा स्वार होतात. चंद्रामुळे आकाश सुदृढ जाणवते. भरतीमुळे समुद्र बलसागर दिसतो. चंद्रामुळे नक्षत्रांना आनंद वाटतो. समुद्र क्षितिजाला आनंदित करतो. चंद्र दिशांचा स्वामी आहे. समुद्र नवरसांचा प्रवर्तक आहे. कितीही तुलना करा. ती अपूर्ण आहे. ही तुलना तंतोतंत नाही. चंद्र आणि समुद्राच्या जागी तुम्ही 'भवरलाल भाऊ' हा शब्द ठेवून पाहा. निश्चित अनेक गोष्टी जुळतील आणि इहलोकातील जगण्याकडे बघण्याचा तुमचा आमचा दृष्टिकोन त्यामुळे निश्चित बदलेल!*



कृषी शास्त्रज्ञ व तज्ज्ञांच्या एका समारंभात डॉ. भवरलाल जैन बोलत असून समोर डॉ. आप्पासाहेब पवार, डॉ. ज्ञानदेव हापसे, श्री. बनकर यांच्यासारखे नामवंत लोक लक्षपूर्वक भाऊंचे बोलणे ऐकताना.

विचाराच्या कड्यावरून कोसळते. विवेक कोणत्याही परिस्थितीत कोसळत नाही. बुद्धी स्वार्थपरायण असण्याची दाट शक्यता असते. विवेक निःस्वार्थतेच्या अवकाशात खुलतो. बुद्धीला अहंतेची बाधा कळत-नकळत लवकर होते. विवेक अहंतेवर मात करतो. बुद्धीला नम्रतेचे भान असते. विवेकात नम्रता गृहीत असते. बुद्धीतून जगण्याची समीकरणे बाहेर पडू शकतात. विवेकात जीवनाच्या समीकरणांचे निरपेक्ष विश्लेषण असते. बुद्धी स्वतःसाठी पक्षपाती होऊ शकते. विवेक पक्षपाताच्या अतीत असतो. बुद्धीचे निर्णय बुद्धीच्या मर्यादेतून घेतले जातात. विवेकातून घेतलेला निर्णय जीवनाचे मूल्य होतो. बुद्धीचे सामर्थ्य कधीकधी कळत नाही. विवेकातून बुद्धीच्या सामर्थ्याचे साधार विवेचन करता येते. बुद्धी जाणिवेला कधी कधी बाजूला सारते. विवेक जाणिवेला प्राधान्य देतो. सद्सद्विवेकबुद्धी मिळवायला विवेकी व्हावे लागते. बुद्धीतले तारतम्य लक्षात आले की, विवेक निर्माण होतो. भाऊंच्या ठिकाणी हा विवेक व बुद्धी किती ठासून भरलेली होती आणि तिचा ते किती अचूकपणे वापर करीत हे वरील वर्णनावरून आपल्या लक्षात येऊ शकेल. निदान ज्यांना ज्यांना भाऊंचा सहवास लाभला त्यांना तर ते लगेचच समजू शकेल.

भाऊंचे भाषण श्रोत्यांचे प्रबोधन करी तसेच श्रोत्यांना बहुश्रुत करी. भाऊंनी जग अभ्यासले. ज्ञानाशी मैत्री केली.



विधायक प्रकल्पांशी जवळीक केली आणि सोबत भारतीय संस्कृतीची उदात्त शिकवण जपली. आयुष्यात भाऊंनी प्रत्येक लहान शेतकरी हा उद्योजक आहे असे मानले. त्याच्या विकासाचा ध्यास घेतला. भाऊंची ही मानवता आजही त्यांच्या भूमीतून आपल्याला व्यक्त झालेली दिसते. भाऊंच्या सन्मानांची यादी हा एक वेगळा अग्रलेखांचा विषय आहे. ठळकपणे सांगायचे झाले तर भाऊंची ठिबक सिंचन योजना आणि सिंचनक्षेत्रातील प्रकल्पाबद्दल महाराणा प्रताप कृषी विद्यापीठाने सन्माननीय डॉक्टरेट देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने भाऊंना 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही सन्माननीय पदवी दिली. कोकण कृषी विद्यापीठाने आणि तामिळनाडू कृषी विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स'च्या पदवीने भूषविले. भाऊंना आजपर्यंत एकूण आंतरराष्ट्रीय १२, राष्ट्रीय १३५, राज्यस्तरीय ४१, राष्ट्रीयस्तरावरील संस्थांचे ७१ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील १६ पुरस्कार मिळाले. हे सांगण्याचे मुद्दाम कारण असे की भाऊंचे काम हेच लोकांनी लक्षात ठेवावे. वेगवेगळ्या वृक्षांचा भाऊंनी केलेला अभ्यास 'भाऊंची वाटिका' आजही थक्क करते. रात्रंदिवस मातीत राबणारा शेतकरी जेव्हा हसतमुखाने मातीतून पिके फुलवू लागला त्यावेळी भाऊंना कृतार्थ वाटले. गावागावातील शेतकऱ्यांनी जेव्हा पाणी जगविले व ही फुलणारी हिरवाई म्हणजेच भाऊ होत. हिरवाईतून जीवन फुलते आणि जीवनातून आनंद फुलतो. भाऊंनी वृक्षाचा केलेला अभ्यास विलक्षण आहे. नक्षत्रानुसार त्यांनी केलेल्या वृक्षांची

**ग्रॅन्ड नैन जातीच्या केळीची टिश्यूकल्चर पद्धतीने रोपे बनवून व त्याचे पूर्ण तंत्रज्ञान विकसीत करून भवरलाल जैन यांनी केळी पिकात मोठी क्रांती घडवून आणली त्यामुळे शेतकरीही अर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला.**



मांडणी आजही पाहायला मिळते. वृक्षवल्ली हे आपले सोयरे आहेत. त्यांना जर आपण सांभाळले तरच माणूस जगेल. वृक्ष जसे औषध देतात तसे जगण्याची सुंदरता देतात. लिंबोळ्यांपासून तेल काढता येते आणि ते कीडींवरचे औषध आहे. घराच्या अंगणात कडूनिंब लावला तर हवा शुद्ध होते. कडुनिंब हा माणसाचा खरा भाऊ आहे ही भाऊंची दृष्टी आजही मोलाची आहे.

भाऊंनी स्वतःच्या शरीराची पर्वा केली नाही. आपला प्रत्येक श्वास समाजाच्या भल्यासाठी आहे हे त्यांनी मानले व त्यातून जगण्याला नवी ऊर्जा दिली. भाऊ नेहमी म्हणायचे मी नेहमी सहकाऱ्यांसोबत असतो आणि नेहमी माझ्या झाडांच्या सावलीत बसतो. या सावल्या माझे लहानपण सांभाळतात. मला नेहमी जमिनीची आठवण करून देतात. त्यामुळे मला कधीही अहंकार शिवत नाही. लोक मला नेहमी म्हणतात इलेक्ट्रॉनिक वस्तुंचा कारखाना, वेगवेगळ्या गाड्यांचा कारखाना, हा व्यवसाय केला असता तर तुम्ही नंबर एकचे उद्योगपती झाला असता. यावर भाऊंचे उत्तर मनावर कोरून ठेवावे असे आहे. भाऊ म्हणाले, ''असे जर मी काही केले असते तर मला आतापर्यंत कधीही समाधान लाभले नसते. कारण की जे काम केले त्यामुळे लोकांना आनंद मिळाला. दुसऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यातच मला आनंद आहे. मोठेपणाच्या हव्यासापोटी मी कधीही कोणाकडेही गेलो नाही. कारण नंतर आपल्याबद्दल वृत्तपत्रात सतत चांगले छापून आले पाहिजे असे वाटत राहते. आपल्या मूल्यमापनात मी मोठा असेल तर आहे आणि नसेल तर नाही. परंतु माझ्या मनात मात्र मी काय आहे याची सद्सद्विवेकबुद्धी माझ्यापाशी नक्की आहे'' आणि मी ती जपली आहे. ती माझ्या जगण्याचा अविभाज्य घटक आहे. माझ्या नातवाने काळा गॉगल घातला जीन्स पॅन्ट घातली, मी त्याला म्हणालो हे काय? तो म्हणाला? असे डाकू स्मगलर असतात. तू सुद्धा हेच कपडे घालतोस? तो म्हणाला, आईने मला हे घालायला दिले आहेत. त्यावर मी म्हणालो तुझ्या आईने तुला विहिरीत उडी मारायला लावली तर तू मारशील? असे म्हटल्याबरोबर त्याने तसे कपडे घालणे बंद केले. भाऊ नेहमी मित्रांना म्हणत, केवळ पुस्तकं वाचून हे जमत नाही. मुलं, माणसं, घटना या सुद्धा वाचाव्या लागतात. तरच समृद्ध जीवन जगता येतं. भाऊ उद्योगक्षेत्रातील ऋषी जमशेटजी टाटांना आदर्श मानत. राहूल बजाज, वि.स. खांडेकर, जवाहरलाल नेहरू, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि लोकमान्य टिळक हे त्यांचे आदर्श होते. जीवन जगण्याचे आदर्श म. गांधीजी होते. मोठ्या माणसांकडून चांगला माणूस होण्याचे



अनुभूती शाळेच्या हिरवाईवर चिमुकल्यांसोबत प्रेमळ दादाजी



**जैन इरिगेशनचा कारभार समर्थपणे सांभाळून त्याचा जगभर विस्तार करणारे पिता भवरलालजी आणि चार पुत्र! अशोक भाऊ, अनिल भाऊ, अतुल भाऊ, अजित भाऊ**

विचार जे आहेत ते भाऊंनी या सगळ्यांची चरित्रे वाचून गोळा केले. याचा परिणाम म्हणजे त्यांची मुलांशी दोस्ती झाली. मुलांशी संवाद कसा करावा हे त्यांनी फार कल्पकतेने जाणले. ते मुलांना नेहमी सांगत माझ्यासारखे होऊ नका, माझ्यापेक्षा मोठे व्हा. नक्कल करण्याची गरज नाही. मला अनेक वेळा बायपास सर्जरीला सामोरे जावे लागले. तुमच्या नशिबी काही येऊ नये अशी माझी इच्छा आहे. आपला दिवस अभ्यासात व शाळेत घालवा. लक्षात ठेवा. आत्मविश्वासासारखा समर्थ गुरू नाही.

ज्ञानाशी मैत्री करताना कधीही संकटाच्या वेळी अंतर्बाह्य स्वतःला सांभाळत राहा. हीच परीक्षा असते. यातून चुकीचे मार्ग निवडले जातात. तसे करू नका. यशस्वी जीवनामागे आपणच आपले आदर्श व्हावे. आदर्श फक्त असामान्य असतात असे नाही. अती सामान्यही आदर्श असतात. मी लुधियानात एकदा रस्त्याने चाललो होतो. रस्त्याच्या कडेला बुटपॉलिशवाला होता. त्याला विचारले कसे काय चाललंय. तो हसला आणि त्याच्या उत्तराने माझ्या मनात वेगळा प्रकाश उमटला. तो म्हणाला, ''साहेब काय सांगू मृत्युचे दुःख नाही. जगण्याचे सुख नाही. सकाळी उठतो. पोटाची खळगी आणि माझ्यावर जे अवलंबून आहेत त्यांच्या जेवणाच्या धडपडीसाठी काम करतो. पण मनात नाराजी असली तरी हे आपले कर्तव्य आहे ते कधीही विसरत नाही.'' या त्याच्या बोलण्याने भाऊंना अंतर्मुख केले.

जीवनात वेळेचे भाऊंनी नियोजन केले. जीवनात कधीही अलार्म वॉच वापरले नाही. भाऊंना वाटे शरीर रचना एक आश्चर्य आहे. दीड वर्ष तर भाऊ घड्याळ वापरतच नव्हते. भाऊंची दैनंदिनी त्यांच्या शरीराने व मनाने पूर्ण स्वीकारलेली होती. प्रत्येक क्षणाचा उपयोग करण्याचे शिका. वेळेचे आपण नियोजन केले नाही तर जीवनाचे नियोजन करू शकणार नाही. ही भाऊंच्या दृष्टीची रीत विलक्षण होती. विचारातील विविधता आणि एकात्मता हे त्यांच्या रक्तात होते. ध्येय धोरणांची ते तर्कशुद्ध मांडणी करीत आणि आपल्या मतांवर तेवढेच ठाम राहात. आपली मते ते पारदर्शकतेने मांडत. रेल्वेचे जसे स्वतंत्र केंद्रीय अंदाजपत्रक आहे तसे शेतीचे वेगळे केंद्रीय अंदाजपत्रक करायला हवे ही भाऊंच्या दृष्टीची झेप आहे. शेतीत प्रगती करण्यासाठी आपल्याकडे किमान हजार गुणवत्तेची तरी शेती महाविद्यालये निर्माण झाली पाहिजेत. दुर्दैवाने आज ती इतकी नाहीत. निसर्ग नियमांचे पालन करणे आणि त्यांचा समतोल सांभाळणे ही अहिंसा आहे. हा समतोल बिघडला तर माणसाला वाईट परिणाम भोगावे लागतील. वाईट परिणाम मात्र निसर्ग आहे तसा राहणार नाही. माणूस जन्माने महान नसतो. तो कर्माने महान होतो. हा विचार भाऊंनी आयुष्यभर जपला.

भाऊंनी आपली कल्पकता आणि दूरदृष्टी अत्यंत आपलेपणाने जपली. आज जैन इरिगेशनचे अध्यक्ष मा. अशोक, अनिल, अजित व अतुल हे सारे कर्तव्यदक्ष आणि भावना जपणारे त्यांचे वारसदार आहेत. जैन उद्योगसमूह हे आज एक विशाल कुटुंब झाले आहे. हा परिसर याच ध्येयाने जपला आहे. काव्यात्मक भाषेत बोलायचे तर –

जास्तीत जास्त उत्कृष्ट काम,  
सहकाराचे जपावे नाम...  
कसं? आणि का? चा घ्यावा शोध,  
उच्च विचारांपासून घ्यावा बोध...  
उज्ज्वल भविष्याची स्वप्ने बघावी,  
त्याला कृतीची जोड द्यावी...




# पाण्याशी अखंड मैत्री हीच देवपूजा

*भाऊंनी आयुष्याच्या अखेरपर्यंत पाण्याचे चिंतन केले. ते जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकासाचे निरनिराळे प्रयोग करून साठविण्याचा व डोळ्यात तेल घालून वापरण्याचा प्रयत्न केला. पाण्याचा ओघ वाकडा असला, तरी पाणी वाकडे नसते. ते सरळ असते. प्रलयकाळी पाणी प्रलय होते. ते किती रौद्ररूप धारण करून भूमीसकट सारे कसे वाहून नेते हे कांताई बंधारा बांधल्यानंतर आलेल्या पहिल्या पुरातच भाऊंनी अनुभवले होते. त्यांच्या पायाखालची भूमीही क्षणार्धात नष्ट झाली होती. प्रलयाचे पाणी मृत्युचे साम्राज्य निर्माण करते. त्यातला द्रवपणा भयंकर असतो. पण तेच पाणी पाईपात घालून बंदिस्त केले आणि थेंबथेंब झाडाच्या मुळाला दिले की हिरव्यागार फळाफुलांनी डवरलेले नंदनवन उभे राहते. पाण्याचे पवित्रपण त्यातल्या विशुद्धतेत असते. ते भाऊंनी ओळखले होते. त्यामुळे त्यांनी पाण्याशी कायम मैत्री केली. जगण्याची विशुद्धता जगण्याच्या नितळपणात आहे, जगण्याचा गवगवा करणारा, जगण्यापेक्षा, जगण्याची जाहिरात जास्त करतो हे भाऊंनी ओळखले होते. त्यामुळे पाण्याचे मन ओळखून त्याला जपण्याचा ते सातत्याने प्रयत्न करीत राहिले. झाडाच्या मुळाशी गेल्यानंतर पाणी कधीही परत येत नाही. ते त्या वृक्षातच विरते. त्या वृक्षाचे ते अंग होते. वृक्षात पाण्याच्या रूपाने रस असतो. ही पाण्याची समरसता जगण्याचा महान अर्थ सांगून जाते. आपण जिथे असतो, त्या परिसराशी समरस होणे, हे जगणे असते. जळगावच्या जैन हिल्सवर गेल्यावर याचा साक्षात्कारी अनुभव तुम्हालाही निश्चित होईल. भाऊंनी महान कर्तृत्वाने तो तुमच्यासाठी ठेवा उभा करून जपून ठेवला आहे. बघा, तुम्हाला त्यात काही भर घालता आली तर!*

कौशल्याची कसोटी पाहावी,
निःस्पृहता जागी असावी...
हसून निराशा दूर करावी,
सुखाबरोबर दुःखे वाटून घ्यावी...
त्यागाचा नवा आनंद मनी फुलवू या,
धरणीमातेचे ऋण थोडेतरी फेडू या...
ताणतणावात झगडून उजळतो. सर्वोत्तमाचा आविष्कार
तन, मन आर्पिल्याशिवाय येत नाही यशाला आकार.

मातीच भान हे खरे माझे इनाम हे तत्त्व भाऊंनी सांभाळले. नव्या नव्या प्रकल्पांना संजीवनी दिली. भरपूर अभ्यास केला चिंतन केले. आपल्या मातीवर, देशावर त्यांनी अथांग प्रेम केले. भारतातला शेतकरी सुखी झाला पाहिजे त्याला ऐहिक सुख मिळाले पाहिजे पण त्याचबरोबर तो संस्कारीत पाहिजे. त्याला जबाबदारीचे भान आले पाहिजे ही भाऊंची कळकळ आजही जैन उद्योग समूह मनाने सांभाळतो आहे. जैन परिवाराने जैन इरिगेशनचे पंख आणखी विशाल केले आहेत याचा भाऊंना निश्चित आनंद वाटत असणार. म्हणून भाऊंचे पुण्यस्मरण आम्हाला मनापासून करावेसे वाटते. भाऊंच्या जीवनाचा आलेख व कार्य कुठल्याही एक विशेषांकात किवा पुस्तकात मावणार नाही. परंतु भाऊंच्या कार्यस्मरणाला आम्ही जी काही ही तुळशीची पाने वाहात आहोत त्याची आठवण आपण सर्वजण चांगल्या मनाने करू या.

# कर्म हेच जीवनाचे मुख्य प्रयोजन

*कर्मनिष्ठेतून आणि ज्ञाननिष्ठेतून जीवनाला चांगला आकार लाभतो. हा विचार उपनिषदकाळापासून भारतीय परंपरेत चालत आलेला आहे. उदा. ईशावास्योपनिषदात कर्म करीत आणि ज्ञान मिळवीत शंभर वर्षे जगण्याची इच्छा ऋषिमुनी करतात. कर्म हे जीवनाचे मुख्य प्रयोजन आहे हे भाऊंनी लहानपणीच ओळखले होते. त्यामुळे सरकारी नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय उभा करण्याचा नाद म्हणा, छंद म्हणा किंवा ध्येय म्हणा ते त्यांनी पूर्ण केले. या व्यवसायातूनच आपल्याला विधायक कर्मे करता येतील याचा साक्षात्कारच जणू त्यांना झाला होता की काय? असे वाटते. ही विधायक कर्मे आनंददायी ठरतात. जीवनाचे हे महत्त्वाचे सूत्र आहे. यातून जीवनाकडे बघण्याची विधायक दृष्टी कळते. जगण्याचा प्रत्येक क्षण सदुपयोगाने जगणे हा भाऊंना पुरुषार्थ वाटे. लाचारीने न जगता तपाने जगणे किंवा ज्ञानाने जगणे ही, त्यांना श्रेष्ठ जगणे वाटले. त्यामुळे त्यांचे जगणे नीरस झाले नाही. जगणे लादले की उत्साह संपतो. करायचे म्हणून तो करतो. यासाठी माणसाने आपल्या जीवनाचा पथ व्यवस्थितपणे निवडून काम करायचे असते. क्षुद्र आकर्षणात कधीही थांबायचे नसते. पुरुषत्व हे उत्कृष्ट कामातून प्रतिबिंबित झाले पाहिजे. म्हणून कर्मफलाच्या अभिलाषेत न गुरफटता विधायक प्रकल्पांनी समाजाला उत्तम आदर्श घालून देणे हा कर्मयोग आहे याची जाणीव ठेवून भाऊ आयुष्याच्या अखेरपर्यंत तशीच वाटचाल करीत राहिले.*



# श्रद्धा



# धाम



# भाऊ आणि कांताई-अद्वैत नाते

श्रद्धा हा मानवी जीवनाचा आंतरश्वास आहे. माणूस कायम श्रद्धावस्थेतच असतो. फक्त त्याच्या श्रद्धेच्या प्रतिमा त्याला जशा भावतील तशा तो निर्माण करतो. ती एक उपजत प्रवृत्ती आहे. एखादी गोष्ट मनाला भावते आणि ती जेव्हा विचाराला समृद्ध करते तिथे श्रद्धा निर्माण होते. श्रद्धा कधीही सांगून जन्माला येत नाही. तुम्ही याच्यावर श्रद्धा ठेवा हे जीवनातले सगळ्यात फसवे वाक्य आहे. कारण श्रद्धेमध्ये आवडीपेक्षा निवडीची मूल्ये अधिक प्रभावी असतात आणि निवड ही मूल्यांच्या देवाणघेवाणीतूनच माणसाला संपन्न करते. त्यामुळे श्रद्धा ही नेहमीच व्यापक असते. ती जगण्याला अवकाश देते. आपले जीवन समृद्ध करते. समृद्धी ही केवळ भौतिकीच नसते. ती तुमच्या नैतिक वर्तनातून पदोपदी व्यक्त होते. त्यादृष्टीने आपले जगणे जर संपन्न असेल तरच आपली श्रद्धा डोळस असते. सक्तीचे वटहुकुम काढून श्रद्धा निर्माण होत नाही. वर्तमानाला जिवंत ठेवणारी श्रद्धा ही एक दिव्यशक्ती आहे. ती ओळखावी लागते.



अशा श्रद्धा मानवी जीवनमूल्यांची धामे असतात. धाम म्हणजे घर हा स्थूल अर्थ झाला. परंतु धाम म्हणजे माझ्या अंतःस्थ मनात जो सात्त्विक शक्ती निर्माण करतो आणि त्या शक्तीतून मला पुढच्या नव्या नव्या प्रकल्पांची जी प्रेरणा देते त्या ठिकाणाला श्रद्धाधाम म्हणतात. असे धाम ईश्वराचा निवास असतो. त्या धामात नैतिक मूल्यांची सरोवरे असतात. त्यातून आपुलकीची कारंजी थुईथुई नाचतात. तो त्याच्या साऱ्या आसमंताला पुलकित करतो. कष्टाचा रत्नहार निर्माण करतो आणि तो जनता जनार्दनाला अर्पण करतो. यामध्ये जे एक हृदयंगम ऐक्य निर्माण होते, त्याला भारतीय संस्कृतीत श्रद्धाधाम असे म्हणतात. या श्रद्धाधाममध्ये चांगल्या प्रकारचे मनन व्हावे. उत्तम विचारांची सुंदर हिरवाई जन्माला यावी. नव्या नव्या इंद्रधनुष्यांची स्वप्ने साकारावीत. व्यक्तिमत्त्वाला आकार यावेत. असे हे श्रद्धाधाम निव्वळ स्मारक नाही. ते कृतज्ञतेचे तीर्थ आहे. भाऊंनी आपले सगळे जीवन माणसाला आणि सृष्टीला समर्पण केले. तर कांताबाईंनी प्रपंच उत्तम सांभाळला. कुटुंबावर व नव्या पिढीवर चांगले संस्कार केले. कुटुंबातल्या प्रत्येकाला काय हवे नको ते बारकाईने बघितले आणि नव्या नव्या संकल्पांना प्रोत्साहन दिले. असे आदर्श जीवन समाजाला देवून ज्यांनी आपले जगणे कृतार्थ केले त्यांची ही आठवण आपण मनात जपावी. आणि आपण आणखी मोठे चांगले काम करावे. या दृष्टीने जर श्रद्धाधामाकडे बघितले तर आपले मन स्वच्छ होईल आणि तुम्ही वर्तमानात नवे होऊन जाल.

# कृतज्ञतेचे महन्मंगल दालन





श्रद्धेय मोठ्याभाऊंचं अस्तित्व जैनहिल्सच्या व श्रद्धाधामच्या कणाकणात सामावलं आहे हे क्षणोक्षणी जाणवतं. कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि कृतज्ञता ही जीवनमूल्ये आचरणात आणणाऱ्या भाऊंनी आदर्श कार्यसंस्कृतीचा वसा आणि वारसा सर्वांना दिला.

'सार्थक करूया जन्माचे. रूप पालटू वसुंधरेचे!' भाऊंचा हा आयुष्यभराचा ध्यास. शेती, शेतकरी, पाणी यासाठी अविश्रांत कष्ट वेचले भाऊंनी. भाऊंनी या क्षेत्रात केलेलं कर्तृत्व आपणासमोर आदर्श वस्तुपाठ आहे. भाऊंच्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करीत आहोत, करणार आहोत. मोठ्याभाऊंनी आयुष्याच्या वाटचालीत केलेली निर्मिती विशाल–व्यापक स्वरूपाची आहे. त्या निर्मितीच्या अगदी अल्पांशाएवढी निर्मिती करण्यासाठीही आपल्याला खूपच प्रयत्न करावे लागणार आहेत. आपण भाऊंनी संस्कारित केलेल्या मार्गाने चालणार आहोत. यशसिद्धीसाठी आंतरिक ऊर्जा प्रखर हवी, झपाटून परिश्रम करण्याची तयारी हवी. श्रद्धाधाम हे कृतज्ञतेच महन्मंगल दालन आहे. श्रद्धेय भाऊ आणि आई कांताई यांचं सर्वांच्या हृदयात चिरंतन स्थान आहेच. श्रद्धाधाम त्याचं पवित्र भावनांचा विनम्र आविष्कार आहे.

श्रद्धाधाममध्ये प्रवेश कराल... तेव्हा इथल्या पाना–फुलांशी, थेंबाथेंबाशी मनमोकळेपणाने संवाद साधाल त्यावेळी जैन परिवाराशी असलेले आपले नाते अधिक घट्ट, अधिक आत्मीयतेने बांधले जाईल.

– अशोक, अनिल, अजित, अतुल जैन

# सार्थक करूया जन्माचे। रूप पालटू वसुंधरेचे।।




जैन उद्योग समूहाचे संस्थापक डॉ. भवरलालजी हिरालालजी जैन तथा श्रद्धेय मोठेभाऊ यांचे हे जीवन–लक्ष्य (मिशन) "Leave this world better than you found it" या मूळ इंग्रजी प्रेरक वचनाचा हा मराठी भावार्थ भाऊंच्या संवादात, भाषणात, लेखनात सातत्याने सुस्पष्ट होत असे. भाऊ नेहमी म्हणायचे: ''...जन्माला आलो असताना हे जग जसे होते त्यापेक्षा जाण्यापूर्वी त्याला अधिक समृद्ध व संतुलित करून जायचे आहे. जेवढे दारिद्र्य निर्मूलन करता येईल तेवढे करायचे आहे. घाण व दूषित वातावरण चांगले करता येईल तेवढे करायचे आहे. अंधारात जेवढ्या पणत्या लावता येतील, तेवढ्या लावायच्या आहेत, हेच माझ्या आपल्या जीवनाचे उद्दिष्ट असावे.''

पूरातन काळात मनुष्यजीवन व निसर्ग यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती नव्हती. दोन्ही मिळूनच हे भूमंडळ सुखासमाधानाने नांदत असे, हे मानणाऱ्या भाऊंनी या पृथ्वीतलावर पूर्वापार नांदत आलेल्या ऋषी, कृषीसंस्कृतीच्या वाटेवर चालण्याचे ध्येय–उद्दिष्ट निरंतर जागते ठेवले. पृथ्वीवरचे वातावरण पवित्र, निर्मितीशील, पर्यावरणदृष्ट्या सुसह्य, माणसाच्या आध्यात्मिक वाढ–विकासासाठी उन्नयनकारक असावे हीच श्रद्धेय मोठ्याभाऊंची आस. पृथ्वी सुंदर होण्यासाठी भाऊंनी आयुष्यभर कठोर परिश्रम घेतले. प्रामाणिकपणा, पारदर्शकता, सचोटी, कृतज्ञता ही जीवनमूल्ये स्वत:ही अंगीकारली आणि आपल्या कुटुंबियांवर तसेच सहकाऱ्यांवर, विस्तारित परिवारावर संस्कारित केली. सभोवतालच्या पर्यावरणाकडे, निसर्गाकडे, शेती–शेतकरी–पाण्याकडे पाहण्याचा महन्मंगल दृष्टिकोन दिला, विज्ञाननिष्ठ प्रयोगशीलता दिली आणि सामाजिक बांधिलकीचे दृढ संस्कारही!

पृथ्वीला, या भूमीला मातेसमान मानण्यातच मानवी संस्कृतीचे पिढ्यानपिढ्या हितरक्षण आहे हे भाऊंनी आयुष्यभर कृतिशीलपणे संस्कारित केले. पृथ्वीची सृजनशीलता त्यांना नतमस्तक करीत असे. भाऊ म्हणायचे: ''आई आणि भूमी यांच्यातील नवनिर्मितीचे समान तत्त्व वंदनीय आहे! आईला स्वत:च्या लेकरांकडे पाहताना आपण पहा किंवा हिरव्यागार पिकाला वाऱ्यावर डोलताना धरणीमातेला होणारा आनंद संवेदनेने जाणून घ्या, असे पाहण्यात, असे जाणून घेण्यातच, माणसाचे माणूसपण आहे! इतर रचनेचे फार्मुले कृत्रिम आहेत.''

# भाऊ आणि बाई साक्षात ईश्वर स्वरूपच

जिथे सत्याचे अधिष्ठान आहे ती श्रद्धा. जशी श्रद्धा असते तसा माणूस. श्रद्धा ही काटेरी जीवनात हिरवळ निर्माण करते. श्रद्धा तारक असते. आपले आध्यात्मिक जीवन निरामय शांततेने प्रस्थापित करण्याकरता 'अपार' श्रद्धा हवी. ज्यांच्या जीवनात श्रद्धा असते, ते प्रतिकूल परिस्थितीतही उज्ज्वल भवितव्याचे स्वप्न पाहतात. श्रद्धा ही दिशादर्शक आणि स्फूर्तिदायक असते. श्रद्धा स्फूर्ती आहे, चैतन्याची मूर्ती आहे. स्वामी विवेकानंद म्हणत, ''जगाचा इतिहास म्हणजे मोजक्या श्रद्धावंताची जीवनगाथा'' जगण्याला दिशा, गती, आकार, वेग आणि तेज श्रद्धा देते. श्रद्धा ही भावनेची सर्वश्रेष्ठ, परिपूर्ण आणि संस्कारित अवस्था. श्रद्धा अंतर्मनातून निर्माण व्हावयास हवी. श्रद्धा म्हणजे विश्वास. तो उत्पन्न होण्यासाठी ज्या ठिकाणी तो ठेवायचा त्या स्थानाबद्दल प्रेम, आदर, भक्ती हवी.

आम्हा जैन कुटुंबियांच्या मनात अशी श्रद्धा आमचे पुण्यशील तीर्थरूप भाऊ आणि बाई यांच्यावरच आहे. आईवडील साक्षात ईश्वरस्वरूपच! आमच्या श्रद्धेय आईवडीलांनी आम्हाला जन्म दिला आणि नवजीवन घडविताना संस्कारांचा, आदर्श जीवनमूल्यांचा वारसाही दिला. त्यांनीच दाखविलेल्या मार्गावर चालण्याची जीवनरीत आम्ही अंगीकारली आहे – ''सार्थक करूया जन्माचे, रूप पालटू वसुंधरेचे''

आजच्या भाऊंच्या जन्मदिनी आम्ही आईवडीलांना वचन देऊ इच्छितो की, ''आपलं जगणं पवित्र, करुणाशील, प्रेमजिव्हाळ्यानं परिपूर्ण आणि स्फूर्तिदायी होतं. पृथ्वीवरची आपली जीवनयात्रा म्हणजे ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग आणि उद्यमयोग यांचा पवित्र संगमच! आम्ही आपले पुत्र, सुना, नात–नाती आहोत हे आमचं सद्‌भाग्य! आपले अस्तित्व आजही पदोपदी जाणवते... आमच्या ह्रदयात, संस्कारात, विचारात आणि आचरणातही. आपल्या आशीर्वादाचं छायाछत्र सदैव आमच्यावर राहो...''

या श्रद्धाभावासह, प्रेमाच्या आणि आदराच्या निर्मळ भावनेतूनच निर्मिले आहे हे श्रद्धाधाम!

अशोक–ज्योती •अनिल–निशा •अजित–शोभना •अतुल–भावना
अथांग–अंबिका •अमोली •अभेद्य •आशुली •आरोही •अभंग •आत्मन •अन्मय
सुनिता–राजेन्द्र • अंजली–सुशील








# ग्रामीण विकासाच्या दिशा

जळगाव-औरंगाबाद रस्त्यावर जळगावपासून ५० कि.मी. अंतरावर वाकोद नावाचे गाव आहे. हेच भाऊंचे म्हणजे भवरलाल जैन यांचे जन्मगाव. याच गावात ते लहानाचे मोठे झाले. तिसरीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण तिथेच झाल्यावर ते पुढील शिक्षणासाठी जळगावला आले. नंतर मुंबईला गेले. शिक्षण पूर्ण झाल्यावर जळगाव ही कर्मभूमी निवडून व्यवसाय सुरू केला. व्यवसायाचा जम बसल्यानंतर देश आणि जग पादाक्रांत केले. माणूस कितीही मोठा झाला तरी आपलं मूळगाव आणि जन्मगाव विसरत नाही. त्या गावाच्या विकासाला हातभार लावावा असा विचार भाऊंनी केला. पण नुसती कामे करून उपयोग नाही. माणसांची मनेही सुसंस्कारीत व समृद्ध केली पाहिजेत या भावनेने त्यांनी प्रतिवर्षी १५ ऑगस्टला गावात ग्रामसभा घेतली. या सभेतून गावकऱ्यांना परखडपणे मार्गदर्शन केले. सलग १४ वर्षे हा कार्यक्रम राबवून गावाचा पूर्ण विकास घडवून आणला. भाऊंनी गावकऱ्यांसाठी जी १४ भाषणे केली ती ''एक न संपणारा प्रवास, ग्रामीण विकास।'' या शीर्षकाखाली श्री. आनंद गुप्ते यांनी संपादित केली आहेत. या पुस्तकातून भाऊंचे ग्रामीण विकाससंबंधीचे विचार किती स्पष्ट व नितळ होते याचे दर्शन घडते. म्हणून भाऊंच्या वाढदिवसानिमित्त या पुस्तकाचा व त्यांच्या विचारांचा हा अल्पसा परिचय येथे देत आहोत.





भारतीय ग्रामजीवन हा न संपणारा विषय आहे. आम्ही नेहमी तीच वाक्ये बोलतो. भारत हा खेड्यांचा देश आहे. तो कृषीप्रधान आहे. परंतु आज भारतातली खेडी भकास झाली आहेत. शहरांची वाढ सूज आल्यासारखी झाली आहे. फक्त शहरांवरच सरकार खर्च करते आहे. त्यामुळे आम्हाला नक्की काय करावयाचे आहे व कोठे जावयाचे आहे याबद्दल आम्हीच संभ्रमात पडलो आहोत. अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेल्या वाकोद या छोट्याशा गावात भाऊंनी जो शेतीविकास घडवून आणला तो आज ग्रामजीवनाचा आदर्श पाठ झाला आहे. जैन हिल्सवरील 'परिश्रम' या इमारतीचे फार वेगळे महत्त्व आहे. वाकोदच्या मातीत ज्वाला मिरचीचे पीक घेऊन भाऊंची घौडदौड सुरू झाली. ती त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारही देऊन गेली. याचे कारण कठोर परिश्रम, एकाग्रता आणि समय सूचकता होय. भाऊंचा हा प्रवास या निष्ठेने झालाय. वाकोदमध्ये भाऊंनी जो शेतीचा अभ्यास केला त्यातूनच त्यांना शेतीमधल्या प्रबोधनाच्या पाऊलखुणा मिळाल्या. विविध प्रकारचे सहकारी व सहकार्य मिळाले. गावातल्या माणसांचा चांगला परिचय झाला. त्यांनी चांगले प्रबोधन केले. सकारात्मक वृत्तीचे कार्य निर्माण केले. गावकऱ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणले. यासाठी भाऊंना खूप त्रास सोसावा लागला. ही गोष्ट सोपी नव्हती. भाऊंच्या या कष्टदायक प्रवासात शेतीतज्ज्ञ डॉ. अप्पासाहेब पवार आणि डॉ. अण्णासाहेब शिंदे यांची भेट झाली. भाऊंचे काम बघून या दोघांनी असे उद्‌गार काढले, ''कृषी क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाबद्दलची आमची स्वप्ने तुम्ही पूर्ण कराल हा आमचा विश्वास आहे.'' हे शब्द भाऊंनी सार्थ करून दाखविले. माती अडवा व पाणी जिरवा सारखे जलसंधारणाचे अनेकविध प्रयोग केले. याचे कारण भाऊंनी ग्रामजीवनाला समाजभिमुखतेचे माध्यम म्हणून पाहिले. माणसा–माणसातला सद्‌भाव वाढवावा. त्यांच्या चांगुलपणाने देशाची व कुटुंबाची प्रगती व्हावी. माणसे निर्व्यसनी राहावीत. ग्रामपंचायतीने चांगला कारभार करावा. मुला–मुलींना चांगले शिक्षण द्यावे. यावर म. गांधीजींनी जो भर दिला तोच भाऊंनी तंतोतंत पाळला. कोणताही प्रसंग येवो पोलिसांची मदत घेणार नाही. सामंजस्य व प्रेमानेच तोडगा काढेल ही भाऊंची विधायक भूमिका म्हणजे ग्रामविकासाची नांदी होती. गावागावात असे भाऊ निर्माण व्हायला पाहिजेत कारण भाऊंची अशी श्रद्धा

होती की जोपर्यंत खेडे बलिष्ट होत नाही तोवर भारत कधीही सुधारणार नाही.

भाऊंनी हे मनावर घेतले आणि त्यांनी याचा ध्यास घेतला. जो स्वतः चिंतनशील आहे आणि जो सतत समाजासाठी काही करीत आहे त्याची प्रगती आपोआप होते. शिक्षणाने जशी पिढी सुधारते तशी अनुभवाने माणसे सर्व प्रकारची सुधारतात. ही भावना ग्रामीण जीवनात निर्माण झाल्याशिवाय ग्रामविकास प्रत्यक्षात येत नाही. समाजाला सुबत्ता नक्कीच हवी पण सुबत्तेला जर चांगल्या विचारांची जोड असेल तर माणूस अधिक पुढे जाऊ शकतो. दुर्दैवाने असे घडत नाही याचे कारण थेट पर्यंत पसरलेला भ्रष्टाचार. कुठेही पैसे दिल्याशिवाय काम होत नाही ही वृत्ती सर्रास झालेली दिसते. त्यामुळे कोणतेही काम चांगले करण्यापेक्षा त्या कामात कोणकोणते अडथळे येतील याचीच चिंता लागलेली असते. मी माझे गाव सुधारून दाखवीन अशी भावना सगळ्यांचीच असली पाहिजे तरच ग्रामजीवनात स्वयंरोजगार निर्मिती होऊ शकते. महिलांचे सबलीकरण होणे हे




ही गरजेचे आहेत. त्याच प्रमाणे महिलांनी आपल्या मुलांवर स्वावलंबनाचे संस्कार केले पाहिजेत. सगळ्यांसाठी उत्तम रस्ते निर्माण झाले पाहिजेत. अतिक्रमणे व्हायला नकोत. सर्वांच्या घरात स्वच्छ शुद्ध पाणी पोहोचले पाहिजे. हा बारीक विचार भाऊंनी 'ग्रामीण विकास – एक न संपणारा प्रवास' या पुस्तकातून मांडला आहे.

सगळ्यांनी मिळून जर आपला सहभाग दाखविला तर ते काम मोठे होत जाईल. गावाचे कुठलेही काम असो त्याची रूपरेषा स्वच्छ मनाने काढता आली पाहिजे. शाळा म्हणजे शिकवणीचे कारखाने नव्हेत. जसे गाव तिथे मंदिर असते तसे गाव तिथे शाळा असली पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. चांगले शिक्षक नेमून मुलांना त्यांनी स्वावलंबनाचे पाठ दिले पाहिजेत. शिक्षण हे केवळ स्वतःच्या भल्यासाठी नसते तर ते त्याच्या आधीच्या पिढीसाठी उपयुक्त ठरते. आणि भावी पिढ्यांना उज्ज्वल करते. आपल्या शाळेत कॉपी होता कामा नये. शैक्षणिक विकासाचे


बैलांच्या सहाय्याने शेतीची मशागत करताना डॉ. भवरलाल जैन




काम चांगल्या पद्धतीने मार्गी लागले पाहिजे. गावकऱ्यांनी शाळा सांभाळली पाहिजे. गावाला चांगला दवाखाना असला पाहिजे. उत्तम औषधी व उत्तम सेवेची सोय व्हायला पाहिजे. यासाठी आधी आपण आपली तयारी केली पाहिजे. यासाठी समाजानेही कटिबद्ध झाले पाहिजे.

इंग्रजांच्या राजवटीत म. गांधीजींनी जो लढा दिला त्यावेळी त्यांनी कशासाठी लढा दिला? इंग्रजांनी जे चुकीचे व अन्यायाचे काम केले त्याच्या विरूद्ध लढा दिला. ग्रामपंचायतीतून चांगले सदस्य निवडून गेले तर आपल्या गावाचा कारभार अधिक चांगल्या प्रकारे होईल. ज्या काही चांगल्या गोष्टी करायच्या त्या दुसऱ्यांनी केल्या पाहिजेत. मी काही करणार नाही अशी मानसिकता निर्माण करणे बरोबर नाही. यामुळे माणसे परावलंबी होतात आणि त्यांना पुढचे कुठलेही रस्ते सापडत नाहीत. भाऊंचे स्पष्ट म्हणणे असे होते की, मुलांवर संस्कार करण्याची कामे अत्यंत मनापासून व जाणीवपूर्वक केली पाहिजेत. आपण स्वतः स्वतःस सुधरवले पाहिजे. मुला-मुलींना सक्षम केले पाहिजे. त्यांच्या शिक्षणाला दिशा दिली पाहिजे. आत्मपरीक्षण करण्याची हीच वेळ आहे. गावाला सुधरवणे म्हणजे गावाची प्रकृती पाहून एकूणच गावाच्या गरजा लक्षात घेऊन त्या पलीकडे काम केले पाहिजे. या संदर्भात दोन गोष्टी भाऊंनी अत्यंत महत्त्वाच्या केल्या. एक म्हणजे जातीनिहाय जागांचे प्रातिनिधीक वाटप केले आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुका बिनविरोध केल्या. दुसरा प्रयोग म्हणजे निवडलेल्या प्रतिनिधींवर लक्ष ठेवण्यासाठी शंभर लोकांचा एक दबाव गट तयार केला. त्यांनी प्रतिनिधींवर लक्ष ठेवायचे. हे करणे फार जिकीरीचे होते. पण भाऊंनी ते करून दाखविले. याचे कारण भाऊंची वाणी व त्यांची समजून सांगण्याची हातोटी लोकांना आपली वाटली. याचा परिणाम ग्रामसभेला आपल्या अधिकारांची जाणीव झाली. पंतप्रधानांइतके अधिकार जेव्हा ग्रामसभेला मिळाले तेव्हा एकमताने काम करणे सुलभ झाले. ग्रामपंचायतीचे कर सर्वांनी भरणे आवश्यक आहे हे भाऊंनी सर्वांना समजावून सांगितले. ते आपले राष्ट्रीय कर्तव्य


पाणी आले, अंगणा


वाकोद गावात बांधलेले बाजार ओटे.

आहे. तशी शिस्त आपण लावून घेतली पाहिजे. यातून चांगल्या कामांना गती मिळाली. गावात शौचालये निर्माण झाली. स्वच्छता राहू लागली. सगळ्यांना मिळून आपण काही एक काम करीत आहोत याची जाणीव झाली. हा ही एक संस्कार आहे ही भावना प्रत्येक माणसाच्या मनात निर्माण झाली. माणसांनी माणसांना जाणून काम केले पाहिजे. हे महत्त्वाचे तत्त्व ग्रामीण विकासात पुढे आले. झोपडीतला माणूस घरात राहिला पाहिजे. निदान ती झोपडी चांगली असली पाहिजे. घर नेटके असले पाहिजे. यातून ग्रामजीवनाच्या प्रतिनिधींनी लोकांना लोकशिक्षणाचे धडे दिले पाहिजेत.

भाऊ नेहमी म्हणत, ''भाऊ काही जन्मभर राहणार नाही. तुमच्यातली जी तरुण मंडळी आहेत त्यांना खूप आयुष्य आहे. त्यांनी अधिक शिकले पाहिजेत. समाजासाठी झिजले पाहिजे तरच ही कामे हातून घडतील. पाणी जपून वापरून त्याच्या विषयीची आपुलकी समाजामध्ये असली पाहिजे. पाणी किती वाया जाते याचा विचार गावकऱ्यांनी केला पाहिजे. पाणीपट्टी, घरपट्टी वेळच्यावेळी भरली तरच हा विकास होऊ शकतो. आपल्याकडे थकबाकीदारांची यादी मोठी होत जाते. विशेष म्हणजे श्रीमंत लोकसुद्धा कर भरीत नाहीत. पाईप लाईन टाकण्यासाठी जो खर्च येतो तो फार महत्त्वाचा आहे. तो मोठा असतो. आरोग्य टिकण्यासाठी रस्ते व गटारे बांधावी लागतात. त्यावर जर लोक गुरे-ढोरे बांधू लागली तर काय उपयोग? काही लोक पाण्याच्या मोटारी नळाला लावतात. त्यामुळे इतरांना पाणी मिळत नाही हे ही लक्षात घ्यावे. या सगळ्यांसाठी आपल्याला हे सारे प्रश्न समजून घ्यावे लागतील. विहिरींना पाणी नाही दिवसेंदिवस पाण्याचे दुर्भिक्ष्य होत आहे. हे संपूर्ण जगाचे वास्तव आहे. यासाठी आपल्याला विचार करायला नको का? हा भाऊंचा प्रश्न आज डावलून चालत नाही. ज्यांच्या विहिरी नदी काठावर


वाकोद गावातील अंतर्गत दृश्य व सिमेन्टचे रस्ते



वाकोद गावातील शाळेची अद्ययावत इमारत.

आहेत त्यांना प्रश्न नाही. जिथे कठडे बांधता येतील तिथे ते बांधावे लागतील पण जोपर्यंत खडक लागत नाही तोपर्यंत खोल–खोल जावे लागते. माती वाहून ते पाणी दुसरीकडे घुसते. पाणी एका जागी रहात नाही, पैसे वाया जातात. आपला काय फायदा होतो हे यात ओळखले पाहिजे. यासाठी नेमक्या जागी खणले पाहिजे. कोणावरही अन्याय होता कामा नये. शेतीसाठी जसे पाणी मिळाले पाहिजे तसे गावासाठीही पाणी उपलब्ध झाले पाहिजे. या सर्व प्रश्नांचा विचार जैन इरिगेशनने केला आहे. भाऊंनी हे सर्व प्रश्न अतिशय सूक्ष्मरितीने हाताळले आहेत.

भाऊंच्या मनात फार मोठे शल्य होते ते त्यांनी 'गावाच्या पारावर' या भाषणात विशद केले आहेत. भाऊ म्हणतात, ''मी तुम्हाला सातत्याने सांगतो आहे कोणत्याही एखाद्या चांगल्या कामासाठी एक तरी ग्रामपंचायतीचा सदस्य पुढे आला का? त्याने एखादे जबाबदारीचे काम करून दाखविले का? त्याला कधीतरी असे वाटले का? आपण लोकांच्या भल्यासाठी काही थोडेफार केले पाहिजे? मला माहिती आहे आपल्या गावात काही सज्जन नक्की आहेत. परंतु ते निष्क्रिय आहेत. ते त्यांच्या पुरतेच करतात. आपल्या पुरते सज्जन राहून चालत नाहीत इतरांनाही तसे करावे लागते. तरच सज्जनपणा सक्रिय होतो. चांगल्या गोष्टींसाठी नेहमीच आग्रह धरावा लागतो. कार्यकर्त्याने नेहमी आधी केले मग सांगितले ही भूमिका घ्यायला हवी. आम्हाला हे चांगलेच करावयाचे आहे. आम्ही करूनच दाखवू'', हे भाऊंचे उद्गार ग्रामविकासाचे मर्म नेमकेपणाने स्पष्ट करणारे आहेत.



वाकोदमधील ठिबकच्या आधुनिक तंत्रज्ञानासह बहरलेली शेती

भाऊंना नेहमी असे वाटे कोणत्याही प्रकारच्या कामात लोकांनी मनापासून सहभागी झाले पाहिजे. पैशाचा योग्य तो विनियोग केला पाहिजे. त्यासाठी वेगवेगळे प्रकल्प करावे लागतील. पाणी उपलब्ध करून देण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील. शेतकऱ्यांच्या अडचणी शासनापर्यंत योग्य त्या भाषेत गेल्या पाहिजेत. शेतकऱ्यांना लेखी अभिवचन देणे हा एक महत्त्वाचा टप्पा भाऊ मानतात. तो प्रश्न समंजसपणाने सुटला पाहिजे. आपण कधीही भाग घ्यायचा नाही परंतु गावातल्या गोंधळावर सतत टीका करीत




**अमोली, अभेद्य, आशुली, आरोही, अथांग आणि अभंग या नातवडांसमवेत जैन हिल्स् येथील वडाच्या झाडाखाली बसून प्रातःकालीन न्याहरीचा आनंद घेताना आजोबा**

बसायचे. त्यामुळे गुंड प्रवृत्तीला उत्तेजन मिळते. यासाठी आपण सर्वांनी मिळून हे आपले प्रश्न आहेत असे मानून काम केले पाहिजे. सगळी जबाबदारी शासनावर झटकून चालत नाही. रस्त्यांचे काम जसे आपण हिरीरीने केले पाहिजे तसे बाजाराचेही काम हिरिरीने केले पाहिजे. रस्ता, बाजार, आरोग्याचा दवाखाना हे आमचे आहे ही भावना निर्माण झाली पाहिजे. गावाच्या कल्याणासाठी जर आपण हे काही केले तरच त्यात आपले भले आहे. भाऊंच्या दृष्टीने एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. भाऊंचे स्पष्ट मत असे होते राजकारणाला गावाच्या शिवाराबाहेर ठेवले आहे. म्हणूनच आपण गावाचा विकास साधू शकलो आहे. राजकारण विरहीत काम आणि सामाजिक कार्यासाठी आपली बांधिलकी त्यासाठी आपल्या नियोजनाचे मापदंड निश्चित व नियोजित केले पाहिजे. योग्य उमेदवारांना उभे केले पाहिजे. गावातील वाईट गोष्टींचा आपणच निपटारा केला पाहिजे. या साऱ्यातून आपली माती हिरवीगार झाली पाहिजे आणि त्यातून पिकांचे चांदणे भरगच्च पडले पाहिजे. हे भाऊंचे विचार ग्रामीण विकासाला जसे उपयुक्त आहेत तसेच शहरी विकासासाठीही महत्त्वाचे आहेत. आज आपल्यात ग्रामीण व शहरी विकासाची खोल दरी निर्माण झाली आहे. त्यामुळे विकासाचे भवितव्य अंधःकारमय झाले आहे. भाऊंनी 'एक न संपणारा प्रवास – ग्रामीण विकास' असे अर्थपूर्ण शीर्षक देऊन ग्रामविकासाच्या नुसत्या कल्पना मांडल्या नाहीत तर वाकोद या गावावर त्याचे प्रात्याक्षिक करून दाखविले.

ग्रामविकास हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे याची त्यांनी जाणीव करून दिली. खेडे स्वयंपूर्ण झाले तर माणूस शहरांकडे जाणार नाही. त्याला सुखाने जगता येल. आजची शहरे बेसुमार वाढली आहेत. याला कारण ग्रामीण भाग उद्ध्वस्त झालेत. रोजगार नाहीत. जो तो शहरांकडे धावत सुटला आहे. कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे अशी स्थिती झाली आहे. अशा अस्थिर वातावरणात भाऊंनी त्यांच्या पुस्तकात मांडलेले हे चिंतन वाचकांसाठी येथे मुद्दाम देत आहोत. सुजाण वाचकांनी त्याचे मनन करावे हीच खरी भाऊंना आदरांजली आहे. मी माझ्या आयुष्यात एकतरी कुटुंब क्रियाशील व उद्योगी करून दाखवेल ही भाऊंची अपेक्षा जर आपण पूर्ण केली तर आपले परिश्रम सार्थकी लागले असे भाऊंना वाटेल. भाऊंचे लेखन काय, संवाद काय, किंवा आत्मलेखन काय? आजच्या काळाला पुढे नेणारे आहे. भविष्यकालीन दृष्टी देणारे आहे. जगण्याचा अर्थ अचूकपणे सांगणारे आहे. भाऊ विचारांच्या रूपाने व कर्तृत्वाच्या रूपाने आजही आपल्यात आहेत. त्यांच्या लेखनातील कोणतेही एक पान वाचले तर आपल्याला ऊर्जा मिळते व चांगले काम करण्याचा उत्साह वाटतो. नव्या पिढीला प्रबोधनाच्या वाटा दिसतात आणि पुन्हा असे वाटते भारताचा उज्ज्वल भविष्यकाळ आश्वासक आहे या निमित्ताने भाऊंनाही शब्द सुमनांजली...!

# शेतीचा विकास म्हणजेच ग्रामीण विकास

*शहरे कितीही वाढली आणि विकसित झाली तरी खेडेगावांचे व विशेषतः जिथे शेतीमालाचे उत्पादन होते त्या ग्रामीण भागाचे महत्त्व कायम राहणार आहे. कारण शहरातल्या लोकांना खाण्यासाठी लागणारे रोजचे अन्नधान्य, भाजीपाला, फळे, फुले हे सगळे मोठ्या प्रमाणावर उत्पादित करण्याचे सामर्थ्य खेडेगावांमध्येच राहणार आहे. या खेड्यांचा विकास करण्यासाठी स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपण खूप प्रयत्न केले. सरकारने निरनिराळ्या योजना आणल्या. त्यातून काही प्रमाणात विकास झालाही. परंतु खेडी स्वयंपूर्ण व स्वावलंबी करण्याचे महात्मा गांधीजींचे स्वप्न अपूर्णच राहिले. गांधींनी लोकांना 'खेड्यांकडे चला' असा संदेश दिला. लोकांनी तो बरोबर उलटा केला. लोक आता मोठ्या संख्येने शहरांकडे जात आहेत आणि जागतिक बँकेसह जगातील सर्व वित्तीय संस्थांना आता कळून चुकले आहे की ग्रामीण विकास म्हणजे दुसरे–तिसरे काहीही नसून 'शेतीचा विकास' हाच त्याचा मूळ गाभा आहे. शेतीचा विकास झाला तर लोकांचाही आपोआप विकास होईल. तोही यापुढे कोणत्याही योजनांची मलमपट्टी न करता शेतीसाठी लागणाऱ्या मूलभूत व पायाभूत सुविधा निर्माण करणे (उदा. सिंचन, वीज, बियाण्यांच्या सुधारित व संकरीत जाती, फळबागांची नवीन तंत्राने उभारणी, यांत्रिकीकरण, जैव तंत्रज्ञान वगैरे) गरजेचे आहे. तसे केल्यानेच ग्रामीण विकास साधेल. हे सूत्र भवरलालजींना फार लवकर कळले होते. त्यामुळे त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेतीच्या विकासासाठीच खर्च केले.*






# भाऊंची



# सृष्टी



# सस्नेह नमस्कार

## 'भाऊंची सृष्टी' व भाऊंची वाटिका'

एक विनम्र भाववंदना...

'भाऊंच्या सृष्टी' व 'भाऊंची वाटिका' नावाने दोन अनोखी उद्याने निर्माण करून भाऊंना कृतज्ञतापूर्वक समर्पित करण्याचा हा एक लहानसा प्रयास आहे. या आगळ्यावेगळ्या उद्यानात पवित्र आणि आध्यात्मिक दृष्टीनं निवडक असे वृक्ष लावले आहेत. भाऊंचा पवित्र आत्मा या वृक्षवेलींच्या, पानाफुलांच्या सान्निध्यात राहील.

इथे 'सप्तर्षि', 'नवग्रह', 'तीर्थंकर', 'नक्षत्रे' आणि 'आध्यात्म' आणि 'नीम' यांची ६ समकेंद्रित वर्तुळाकार उद्यानं आहेत. आपण जेव्हाही 'भाऊंच्या सृष्टी'ला, व 'भाऊंच्या वाटिके'ला भेट द्याल, याच्या सहाही वर्तुळात क्रमाक्रमाने प्रवेश करून इथल्या पाना-फुलांशी मनमोकळेपणाने संवाद साधाल, त्यावेळी जैन परिवाराशी असलेले आपले नाते अधिक घट्ट, अधिक आत्मीयतेने बांधले जाईल.

इथल्या सृष्टीशी जुळलेले भावबंध म्हणजे श्रद्धेय मोठ्याभाऊंशी आणि समस्त जैन परिवाराशी जुळलेले अनुबंध...

कायमचे!

**अशोक, अनिल, अजित, अतुल जैन**




# भाऊंची सृष्टी

अनादि अनंत अशा विश्वामधून ब्रह्मांडातील एक तेजस्वी नाव **भवरलाल जैन.**

'हिरवाईनं नटलेली सृष्टी हेच माझे वैभव, हेच माझे कर्म!' हाच अंतर्मनात रुजलेला जीवनाचा कार्यकारणभाव धरून त्यांनी आयुष्याचा प्रपंच मांडला. पानापानातून, फुलाफुलातून ही हिरवाई त्यांच्याशी हितगूज करी. पाण्याचा थेंबन् थेंब त्यांच्या जीवनात चैतन्य आणी.

रात्रंदिन मातीत राबणाऱ्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचं हासू त्यांना कृतार्थता देई.

म्हणूनच जाण्याआधी कायमचाच निरोप घेण्याच्या तयारीनं त्यांनी स्वत: फुलवलेल्या या हिरव्यागार वनराईला डोळ्यांच्या कडाकडांपर्यंत भरभरुन भरभरुन घेतलं; जणू ते शेवटचंच होतं!

या भूमीतच त्यांची चालती-बोलती स्वप्नं आता निरंतर उमलत रहाणार आहेत.

स्वप्नं जलसंवर्धनाची, शाश्वत शेतीची, नवनवीन अक्षय ऊर्जा स्रोतांची, ग्राम विकासाची, विज्ञान-तंत्रज्ञान-कृषी-ज्ञानपीठाची!

ह्या वसुंधरेला समृद्ध करण्याचा यज्ञ इथे अविरत चालत राहील. जोपर्यंत सूर्याची अपरिमित अक्षय ऊर्जा इथली हिरवाई आणि मानवी जीवन फुलवत राहील तोपर्यंत बहरत राहील ही 'भाऊंची सृष्टी'!

# भाऊंची वाटिका

ऋषी–मुनी, तीर्थंकर आणि परमपवित्र आत्मे यांचं वसतिस्थान म्हणजे ब्रह्मांड. तेथूनच फक्त काही काळासाठी जो या अवनीवर अवतरला आणि अवतारकार्य आटोपल्यावर परत ब्रह्मांडामध्ये विलीन झाला. निसर्गावर निरातिशय प्रेम, श्रद्धा असणारा पुण्यात्मा म्हणजेच भवरलाल जैन!

जमीन, हवा, पाणी आणि हिरवाई यांतच व यांच्यासाठीच त्यांनी सारं जीवन व्यतीत केलं. शेतकरी आणि त्याचं सुख–समाधान हेच त्यांच्या जीवनाचं–अस्तित्वाचं मूळ होतं.

सात सप्तर्षिं, नऊ नवग्रह, चोवीस तीर्थंकर, सत्तावीस नक्षत्रं आणि त्रेपन्न आध्यात्मिक ऋषी–मुनी यांच्या दैवी चैतन्यानं भारलेल्या दोनशे एकोणसत्तर वैविध्यपूर्ण वृक्ष–वनस्पतींनी फुललेल्या, ७ एककेंद्रित वर्तुळाकार उद्यानांनी बनलेल्या 'भाऊंची वाटिका' या उपवनात त्यांची आंतर्ज्योत चिरंतन तेवत राहील. त्यांच्या स्वप्नांना वास्तविक आदरांजली देण्याचा हा एक कृतज्ञतापूर्ण प्रयत्न!




| क्र. | प्रकार | वृक्ष | |
|---|---|---|---|
| | | जाती | संख्या |
| १ | वड | | १ |
| २ | सप्तर्षिं उद्यान | ७ | ४३ |
| ३ | नवग्रह उद्यान | ९ | ३७ |
| ४ | तीर्थंकर उद्यान | २४ | २४ |
| ५ | नक्षत्र उद्यान | २७ | २७ |
| ६ | अध्यात्मिक वृक्ष उद्यान | ५३ | ५३ |
| ७ | कडुलिंब उद्यान | ८४ | ८४ |
| | | एकूण | २६९ |



# सप्तर्षी उद्यान

रात्रीच्या आकाशाच्या काजळमायेत आपल्याला सप्तर्षींचा हा तारकासमूह सहज दिसतो आणि ओळखताही येतो. कश्यप, अत्री, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जगदग्नी आणि वशिष्ठ ही विविध घराण्यांच्या मूळपुरुष ऋषिंची नावे असलेल्या ७ तारका या नक्षत्रात आहेत.

सप्तर्षींना वाहिलेल्या वनस्पतींची व त्यांच्या संख्यांची मांडणी आपल्या प्राचीन ज्योतिषशास्त्र-ग्रंथात या प्रकारे सांगितली आहे :

| क्र. | ऋषी | वनस्पती | संख्या |
|---|---|---|---|
| १ | कश्यप | तुळशी | ०१ |
| २ | अत्री | अगस्ती | ११ |
| ३ | भारद्वाज | अपमार्ग | ०१ |
| ४ | विश्वामित्र | बेल | ०८ |
| ५ | गौतम | धोत्रा | १० |
| ६ | जमदग्नी | दुर्वा | ०१ |
| ७ | वशिष्ठ | शमी | ११ |


बेल


धोत्रा

नवविवाहित जोडप्यानं या वनस्पतिंच्या सान्निध्यात सप्तर्षींचं दर्शन घेतल्यास त्यांचा संसार सुखा-समाधानाचा होतो, पती-पत्नीमधील एकोपा दृढ होत जातो अशी श्रद्धा आहे.

हे वर्तुळाकार 'सप्तर्षी उद्यान' भाऊंच्या वाटिकेतील सर्वात पहिले, सर्वात आतील आणि सर्वात लहान समकेंद्रित 'वनस्पती-चक्र' आहे.


सप्तर्षी उद्यानात फुललेली तुळस

# नवग्रह उद्यान

पृथ्वीला आपल्या सूर्यमंडळातील नवग्रहांच्या आकर्षणांमुळे होणाऱ्या विविध परिणामांना तोंड द्यावे लागते. ही आकर्षणे कमी वा अधिक ताकदीची असतात. बदलतही असतात.

या नवग्रहांशी संबंधित असे ठराविक वृक्ष-वनस्पती मानले गेले आहेत. या ग्रहांचे आकाशातील स्थान, व त्यांचा पृथ्वीशी असलेला कोन यांचा अभ्यास करून, या नवग्रह उद्यानात अशा 'ग्रह-वृक्षां' चा कोन व स्थान निश्चित केले आहे.

आपापल्या जन्मकुंडलीमध्ये ज्या ग्रहांची आपल्यावर वक्रदृष्टी असते त्या त्या 'ग्रह-वृक्षां'च्या सान्निध्यात राहण्याने वा त्यांच्या पूजनाने त्या ग्रहांकडून मिळणाऱ्या ऊर्जेने दुष्टफलांची तीव्रता खूपच कमी होते तसेच संपन्नता, स्थिरता, उत्तम आरोग्य व मानसिक संरक्षण अशी सुखे लाभतात अशी समजूत आहे.

### त्या नवग्रहांची व त्यांच्या प्रतिनिधिक वनस्पतींची नावे व दिशा अशा आहेत :

| क्र. | ग्रह | वृक्ष | दिशा/स्थान |
|---|---|---|---|
| १ | सूर्य | मंदार | मध्य |
| २ | चंद्र | पळस | आग्नेय (दक्षिण-पूर्व) |
| ३ | मंगळ | खैर | दक्षिण |
| ४ | बुध | अपमार्ग | ईशान्य (उत्तर-पूर्व) |
| ५ | गुरू | पिंपळ | उत्तर |
| ६ | शुक्र | उंबर | पूर्व |
| ७ | शनि | शमी | पश्चिम |
| ८ | राहू | दुर्वा | नैऋत्य (दक्षिण-पश्चिम) |
| ९ | केतू | दर्भ | वायव्य (उत्तर-पश्चिम) |

*हे वर्तुळाकार 'नवग्रह उद्यान' भाऊंच्या वाटिकेतील दुसरे समकेंद्रित 'वनस्पती-चक्र' आहे.*



पिंपळ



खैर



पांढऱ्या फुलांनी बहरलेली रुईची झाडे

# तीर्थंकर उद्यान

तीर्थ म्हणजे अत्यंत पवित्र स्थळ. असे तीर्थ स्थापन करणारा पुण्यपुरुष म्हणजे तीर्थंकर. जन्म आणि मृत्यूच्या अथांग भवसागरापार आपल्याला तारून नेणारा मार्ग तो दाखवतो.

पृथ्वीच्या उत्पत्तीपासून असे चोवीस तीर्थंकर/सिद्धयोगी आत्तापर्यंत झाले आहेत असे जैन धर्मग्रंथांत म्हटले आहे. त्यामध्ये 'ऋषभनाथ' हे पहिले तर 'महावीर' चोवीसावे म्हणजे शेवटचे तीर्थंकर मानले जातात.

हे वर्तुळाकार 'तीर्थंकर उद्यान' चार समान भागात विभागलेलं असून प्रत्येक भागात या तीर्थंकरांशी निगडित असलेले सहा वृक्ष विराजीत आहेत. क्रमवारीने चोवीस तीर्थंकर व त्यांचे विवक्षित प्रातिनिधिक वृक्ष असे आहेत :

**तीर्थंकरांची नावे आणि त्यांच्याशी संबंधित असलेले वृक्ष**

| क्र. | नक्षत्र | वृक्ष | क्र. | नक्षत्र | वृक्ष | क्र. | नक्षत्र | वृक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ऋषभदेवजी | वड | ९ | सुविधिनाथजी | बेहेडा | १७ | कुंथुनाथजी | तेंदू |
| २ | अजितनाथजी | सेमल | १० | शीतलनाथजी | धुळी पलाश | १८ | अर्हनाथजी | आंबा |
| ३ | संभवनाथजी | साल | ११ | श्रेयांशनाथजी | तेंदू | १९ | मल्लीनाथजी | अशोक |
| ४ | अभिनंदनजी | सरळ | १२ | वसुपूज्यजी | पाटल | २० | मुनिसुव्रतनाथजी | चाफा |
| ५ | सुमतिनाथजी | प्रियंगू | १३ | विमलनाथजी | जांबू | २१ | नमीनाथजी | बकुळ |
| ६ | पद्मप्रभुजी | प्रियंगू | १४ | अनंतनाथजी | पिंपळ | २२ | नेमीनाथजी | मेगश्रृंगी |
| ७ | सुपार्श्वनाथजी | शिरीष | १५ | धर्मनाथजी | दधिपर्णा | २३ | पार्श्वनाथजी | धव |
| ८ | चंद्रप्रभूजी | नागकेसर | १६ | शांतीनाथजी | नंदी | २४ | महावीरजी | साल |

*भाऊंच्या वाटिकेतील हे तिसरे समकेंद्रित 'वनस्पती-चक्र' आहे.*


जांबू


तीर्थंकर उद्यानातील वृक्षराई

# नक्षत्र उद्यान

ज्योतिर्विद्येनुसार आपल्या नभोमंडळात एकूण सत्तावीस नक्षत्रे आहेत. वर्षाचे सारे दिवस या नक्षत्रांमध्ये विभागलेले आहेत. त्यानुसार जगात कुठेही, कोणत्याही क्षणी जन्म घेतलेल्या जीवाचे 'जन्म-नक्षत्र' सांगता येते. त्याचप्रमाणे प्रत्येक नक्षत्राचा एक ठराविक वृक्ष निश्‍चित आहे.

३६०० अंशात म्हणजेच एका वर्तुळात नभांगणातील ताऱ्यांच्या दिशा, कोन मोजून त्या त्या नक्षत्रांप्रमाणे वृक्षांच्या जागा निश्चित करून हे वर्तुळाकार उद्यान बनवले आहे. त्या त्या नक्षत्रात जन्मलेल्या व्यक्तीने आपल्या 'नक्षत्र-वृक्षाच्या' छायेत बसून त्या त्या नक्षत्रांच्या वेळी आराधना, चिंतन, ध्यान धारणा केल्यास त्या वेळी उत्सर्जित होणाऱ्या ऊर्जेने शुभ फलप्राप्ती त्वरेने हाऊन त्यांची शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक उन्नती होते अशी श्रद्धा आहे.:

### प्रत्येक नक्षत्रासाठी खालीलप्रमाणे वृक्षांची मांडणी केली आहे

| क्र. | नक्षत्र | वृक्ष | क्र. | नक्षत्र | वृक्ष | क्र. | नक्षत्र | वृक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आश्विनी | कुचला | १० | मघा | वड | १९ | मूळ | राळ |
| २ | भरणी | आवळा | ११ | पूर्वा | बेल | २० | पूर्वाआषाढा | सीता अशोक |
| ३ | कृत्तिका | उंबर | १२ | उत्तरा | पायरी | २१ | उत्तराषाढा | फणस |
| ४ | रोहिणी | जांभूळ | १३ | हस्त | रिठा | २२ | श्रवण | आंबा |
| ५ | मृग | पिंपळ | १४ | चित्रा | बकुळ | २३ | धनिष्ठा | कडुनिंब |
| ६ | आर्द्रा | कृष्णागरू | १५ | स्वाती | अर्जुन | २४ | शततारका | कळंब |
| ७ | पुनर्वसु | वेळू | १६ | विशाखा | पारिजातक | २५ | पूर्व भाद्रपद | आंबा |
| ८ | पुष्य | पळस | १७ | अनुराधा | नागकेशर | २६ | उत्तर भाद्रपद | कडुलिंब |
| ९ | आश्लेषा | उंडळ | १८ | ज्येष्ठा | सांवर | २७ | रेवती | मोह |



*या सत्तावीस 'नक्षत्र-वृक्षांमध्ये' आंबा, कडुलिंब यासारखे वृक्ष दोन दोन नक्षत्रांचे प्रतिनिधी आहेत हे विशेष!*
*भाऊंच्या वाटिकेतील हे चौथे समकेंद्रित 'वनस्पती-चक्र' आहे.*



नक्षत्र उद्यानातील वृक्षराई

# दुर्मिळ आध्यात्मिक वृक्ष उद्यान

जगातील कोणत्याही धर्माच्या पोथ्या-पुराणांमधे आपल्याला देवी-देवता आणि कर्मकांडाशी संबंधित असलेल्या वृक्षवल्लींचा आणि त्यांच्या पावित्र्याचा उल्लेख हमखास आढळतो.

तुळस, बेल, शमी अशा झाडांचे पूजनही होत असते. फार प्राचीन काळापासून वृक्षवल्लींच्या सौंदर्याचे, उपयुक्ततेचे व प्रभावीपणाचे मानवी मनांवर विलक्षण गारुड आहे.

केवळ औषधी वनस्पतीच नव्हे तर पूजनीय, पवित्र, शुभ मानल्या गेलेल्या त्रेपन्न वृक्षांचे हे उद्यान आहे.

**या वर्तुळाकार उद्यानात ही ५३ झाडे पुढील क्रमानुसार लावली आहेत:**

| क्र. | वृक्ष | क्र. | वृक्ष | क्र. | वृक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | गोरख चिंच | १९ | करंबेल | ३७ | सुरंगी |
| २ | अंकोल | २० | कवंडल | ३८ | ताम्हण |
| ३ | बहावा | २१ | कुंकू/कमळ/शेंदरी | ३९ | उद |
| ४ | बेहडा | २२ | कुसुम/लिंबकोष | ४० | वेत |
| ५ | बिब्बा/भिलावा | २३ | लोध्र | ४१ | वावळा |
| ६ | बीजा | २४ | नांद्रुक/पिंपरणी | ४२ | भवरसाल |
| ७ | बुद्धाचा नारळ | २५ | नर्क्या | ४३ | बेल (पांच पानी) |
| ८ | चंदन | २६ | पारजांभूळ | ४४ | गुग्गुळ |
| ९ | चारोळी | २७ | फणशी/दांडोशी | ४५ | काळ उंबर |
| १० | चुक्रासिया | २८ | पुत्रंजीवा/पुत्रवती | ४६ | पांढरा कांचन |
| ११ | धूप | २९ | रानफणस | ४७ | कांचन गुलाबी |
| १२ | सितारंजन (फिदालवूड) | ३० | रतनगुंज | ४८ | कांचन पिवळा |
| १३ | हिरवा चाफा | ३१ | रोहितक | ४९ | लक्ष्मण फळ |
| १४ | कदंब | ३२ | रुद्राक्ष | ५० | मुचकुंद |
| १५ | कडू कवठ | ३३ | रुद्राक्ष-नेपाळ | ५१ | पान कापूर |
| १६ | कहांडोळ | ३४ | समुद्र फळ | ५२ | चंद्रमुखी रुद्राक्ष |
| १७ | काकड | ३५ | शिवण/गंभारी | ५३ | रक्तचंदन |
| १८ | कापूर | ३६ | सोनचाफा | | |

*भाऊंच्या वाटिकेतील हे पाचवे समकेंद्रित 'वनस्पती-चक्र' आहे.*



बुद्धाचा नारळ



आध्यात्मिक उद्यानातील वृक्षराई

# कडुलिंब उद्यान

कडुलिंब हा आपल्या भारत देशात आणि विषुववृत्ताचे पट्ट्यातील भूभागात सर्वत्र विपुल प्रमाणात सापडणारा, कमितकमी पाण्यावर जगणारा, वाढणारा आणि दुष्काळातही टिकणारा पानगळी वृक्ष आहे.

हा साधारणत: १५ ते २० मीटर्स उंच वाढतो. याला भरपूर हिरवीगार पानं, लहान लहान पांढरी फुलं व पिवळी धमक छोटी लांबटगोल फळं येतात त्यांना लिंबोळ्या म्हणतात. या संपूर्ण वृक्षाची पानं, फुलं, फळं, लाकूड अत्यंत कडू असतात. अर्थातच ते तितकेच औषधीही असतात म्हणून बऱ्याच आयुर्वेदिक औषधांमध्ये, रसायनांमध्यें, सौंदर्य प्रसाधनांमध्ये त्यांच्या अर्काचा वापर होतो.

लिंबोळ्यांपासून तेल काढतात. ते एक उत्तम कीटकनाशक मानलं जातं. घराच्या आसपास कडूलिंब लावल्यास घरात रोगमुक्त, स्वच्छ, शीतल, प्राणवायूयुक्त हवा येते अशी श्रद्धा आहे. कडूनिंब मानवाचा खरा मित्र आहे.

भाऊंच्या वाटिकेतील पाच 'वनस्पती–चक्रांना' संरक्षण पुरविणारं हे सर्वात बाहेरील, सहावे, समकेंद्रित 'वनस्पती–चक्र' आहे.



सत्त्वशिल कडुलिंब



डोळ्यांची पारणे फेडणारा निसर्ग



या द्रष्ट्याची दृष्ट काढूया हा सृष्टीचा दूत
डोंगरमाळावरी घडविला चमत्कार अद्‌भूत

पाण्याचे निर्माण कराया अपुरे अपुले हात
हा थेंबाला मिळवून देतो नियोजनाची साथ

हा शेताला धमणी होऊन योग्य पाजवी पाणी
तृषार्त राने तृप्त होऊन लहरत गाती गाणी

हा मातीचा असीम प्रेमी झिजला मातीसाठी
या मातीच्या कणाकणातून पिकले माणिक-मोती

हा बैलांची पूजा बांधतो हा कृषकांचा साथी
संस्काराची देतो दौलत पुढील पिढीच्या हाती

हा आईचा पुत्र लाडका मातृभक्त हा गुणी
'ती आणि मी' एकच म्हणतो हा कांतेचा ऋणी

सज्जन शक्ती उभी राहुनी समाज व्हावा थोर
मातृभूमीच्या उत्कर्षाचा सदाच याला घोर

हा गांधींचा भक्त येशूचे रक्त पुकारी ह्यास
हा तीर्थंकर नवीन याला सत्य-शांतीचा ध्यास

*- प्रा. इंद्रजित भालेराव,*
*परभणी*

# जैनचे भविष्यदर्शी व्हर्टिकल फार्मिंग संशोधन



भविष्याचा वेध घेऊन कमी जागेवर अत्याधुनिक पद्धतीने शेती करण्याची नवी पद्धत व्हर्टिकल फार्मिंग या प्रकल्पाची आस्थेवाईकपणे माहिती घेताना माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, सोबत संस्थापक डॉ. भवरलालजी जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अजीत जैन.

*दि. २१.०५.२०१४*

# जैन सौर कृषी पंप म्हणजे शेती शाश्वततेचा मार्गच!




सौर पंपामध्ये जागतिक स्तरावर सर्वात मोठे काम करणाऱ्या जैन इरिगेशन कंपनीने ब्रशलेस डी.सी. तंत्रज्ञानाचा वापर करून निर्माण केलेल्या उच्च कार्यक्षमतेच्या सौरऊर्जा पंपाच्या निर्मितीचे अवलोकन करताना केंद्रीय वाहतूक व जलसंपदा मंत्री ना. नितीन गडकरी आणि महसूल आणि कृषी मंत्री एकनाथराव खडसे, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, खा. ए.टी. पाटील. समवेत आमदार संजय सावकारे, उन्मेश पाटील, शिरीष चौधरी, चैनसुख संचेती, त्यांना प्रकल्पाची माहिती देताना कंपनीचे संस्थापक डॉ. भवरलालजी जैन सोबत उपाध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन.

*दि. २५.०१.२०१६*




## स्वप्न वेडा

पाषाण होते विखुरलेले डोंगरी रानीवनी।
स्वप्नवेडा एक त्याने आणले ते वेचुनी।।

आकार नव्हता, रूप नव्हते, दगड वेडे-वाकडे।
लोक हसले तुच्छतेने खूळ कुठले काढले।।



स्वप्नवेडा शांत होता, दृष्टी त्याची आगळी।
दगडामध्ये प्रत्येक त्याने मूर्ती होती पाहिली।।



साकार करणे मूर्ती त्याच्या जीवनाचा ध्यास होता।
प्रेम त्याची शक्ती अन् विश्वास त्याचा श्वास होता।।

स्पर्श त्याचा लाभता पार्थिवता संपून गेली।
संस्कारलेणी लेवुनी चैतन्यमूर्ती उमलली।।

आज जन्माची कहाणी तीच मूर्ती सांगते।
स्वप्नवेड्या माणसाची शब्दपूजा बांधते।।

- डॉ. राजेंद्र मालोसे
*चांदवड*


जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

**मुखपृष्ठ चित्र:** मनोज साकळे ;**कला:** विकास मल्हारा, महेश दांडगे, प्रशांत शिंदे, आनंद पाटील; **अक्षर जुळवणी:** देवेंद्र पाटील, मुरलीधर बडगुजर, विजय तिवारी, विजय भोंगे; **छायाचित्रे:** ईश्वर राणा, धर्मेश शहा, राजेंद्र माळी, राजू हरिमकर, तुषार बुंदे, योगेश सोनार, जगदीश चावला, योगेश संधानशिवे, ललित हिवाळे; **दूरध्वनी:** ०२५७-२२५८०११/२२; **फॅक्स:** ०२५७-२२५८१११/२२; **ई-मेल:** krushitirth@jains.com; **संकेतस्थळ:** www.jains.com; **वर्ष:१; अंक:१** (डिसेंबर २०१८/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही)

मुद्रक, प्रकाशक **मनिष अमृतलाल शहा** यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. वतीने, स्पेन्टा मल्टीमिडीया, पेनीसुला स्पेन्टा, मथुरादास मिल कम्पाऊन्ड, एन.एम.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई (महाराष्ट्र) येथे छापून जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि., जैन प्लास्टिक पार्क, पो.बॉ.नं.७२, बांभोरी, जळगाव-४२५००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केला.
**संपादक:** डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे